प्रकरण तिसरे

# व्यक्तिचित्राचा मानसशास्त्रीय व सामाजिक दृष्टीने अभ्यास

पान क्र. ४० ते ७१

# प्रकरण ३ रे

## व्यक्तिचित्राचा मानसशास्त्रीय व सामाजिक दृष्टीने अभ्यास

मराठी साहित्यामध्ये कथा वाङ्मय प्रकाराने सर्वांचेच लक्ष वेधून घेतलेले आहे. यामध्ये जीवनातील प्रत्येक गोष्टीशी निगडीत असणाऱ्या सत्य व वास्तव कथा साहित्यामधून अवतरलेल्या दिसतात. पूर्वी जो काल्पनिक कथांचा रूपबंध होता तो १९६०-७० नंतर आपणास बदलेला दिसतो. या कालखंडात प्रत्यक्ष कष्टकरी समाजातील अनेक कथाकारांनी साहित्यातून वास्तव सत्य मांडण्याचा प्रयत्न केला आहे. विशिष्ट वातावरणाच्या पलीकडे माणसाच्या जीवनातील दुःख, भय व नियतीचे अटळ सत्य अत्यंत भावपूर्ण व कलात्मक पध्दतीने कथाकारांनी चित्रीत केलेले आहे. पैकी प्रकाश संत यांनी आपल्या साहित्यामधून मांडलेले सत्य, सुख, दुःख, वेदना व याबरोबर सांगितलेला बोध या सर्वच बाबतीत त्यांचे साहित्य हे इतर कथाकारांपेक्षा वेगळे वाटते. त्यांच्या कथासंग्रहातील येणारी व्यक्तिचित्रे यांचा मानसशास्त्रीय व सामाजिक दृष्टीने विचार केल्यास या दोन्ही बाबींमध्ये निश्चितच विशिष्ट संवेदनशीलपणा जाणवतो.

प्रकाश संत यांचे 'वनवास' व 'पंखा' या कथासंग्रहांचा विचार केल्यास हे दोन्ही कथासंग्रह मानसशास्त्रीय व सामाजिक दृष्टीने मनावर विपरीत परिणाम करतात. या कथासंग्रहातील प्रसंगाची, निसर्गाची गोडी कमी होत नाही उलट या कथा मनाला वेड लावतात. एवढ्या उच्चतम दर्जाचे साहित्य लेखन संतांनी केले आहे. यांच्या दोन्ही कथासंग्रहातील पात्रांचा मानसशास्त्रीय दृष्टीने विचार करू -

**लंपन :-**

प्रकाश संत यांनी आपल्या 'वनवास' व 'पंखा' या दोन्ही कथासंग्रहातून एका कोवळ्या, निष्पाप, निरागस व निखळ ९-१० वर्षाच्या लंपनच्या मनामध्ये साचून राहिलेल्या दुःखाला, त्यांच्या भावनांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे. लंपन हे मुख्य नायक पात्र म्हणून दोन्ही कथासंग्रहात वावरताना दिसते. यामध्ये आईचा सहवास न मिळाल्याने त्यांचे मन

उद्‌विग्न व हळवे झाले आहे. केवळ आई-वडिलांच्या इच्छेखातर आजोबा आजीकडे राहायला आला असल्यामुळे आईच्या प्रेमापासून तो वंचित आहे. साहजिकच त्यांचे मनात उपरेपणाची, परकेपणाची जीणीव होऊन त्यांचा स्वभाव अधिकच गंभीर, गूढ झाल्याचे दिसते. ज्या वयात आईच्या प्रेमाची, वात्सल्याची ऊब लंपनला हवी होती त्या वयात लंपनला ती मायेची ऊब मिळाली नाही. त्यामुळे तो नेहमीच विचारांच्या साखळीत वाढलेला दिसतो. जणू काही एकाकी राहून सदैव विचारांच्या राज्यात हरवून जाणे हे त्याच्या मानसिकतेचे प्रधान अंगच वाटते.

एका विशिष्ट स्वभावातून लंपनच्या मनाचे झालेले दर्शन व निरागस मनाचा साक्षात्कार हा कथासंग्रहाचा मुख्य पाया आहे. लंपनच्या माध्यमातून लेखकाने या ठिकाणी समाजातील इतर मुलांपुढे आदर्श ठेवून कौटुंबिक जिव्हाळ्याची अवीट गोडी चित्रीत केली आहे. याचबरोबर आईच्या सहवासाखेरीज मुले कशी अंतर्मुख बनतात, त्यांच्या मनाचा कसा कोंडमारा होतो याचे ज्वलंत उदाहरण लंपनद्वारे स्पष्ट होते. लंपनचा स्वभाव गंभीर, आत्मलक्षी, आत्मकेंद्री व भावनाविवश होण्यामागे केवळ लंपनचे वयच कारणीभूत आहे. त्याला आजी-आजोबांनी भरभरून प्रेम, माया देण्याचा प्रयत्न केला तरी आईच्या मायेची ओढच, तिचा सहवासच केवळ त्याला समाधान देवू शकतो. तसेच समाजातील घडणाऱ्या विविध घटनांचे लंपन सूक्ष्म निरीक्षण करून त्यातून भरपूर काही शिकत आहे. दु:ख असो वा सुख यामध्ये लंपनच्या मनाची व्यथा अधिकच उत्कट वाटते. परंतु हे सर्व पचवण्याची मानसिक तयारी त्याच्यामध्ये पहावयास मिळते. सशाचं काळीज जसं अनामिक भितीने लपलप करते त्याप्रमाणे या ना त्या कारणाने लंपनचे मन सदैव भितीने थरथर कापते. त्याचबरोबर मनातील चंचलपणा सुध्दा दिसून येतो. का? आणि कशासाठी? हे प्रश्न लंपनसमोर नेहमी उभे दिसतात. कोणतीही घटना आपल्याच वाट्याला का यावी? असे त्याला सतत वाटते परंतु कठीण प्रसंगात स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

लंपन लहान असून अभ्यासू आहे. त्यांचेवरती आजी-आजोबा, सुमी याचबरोबर बाबूराव व मित्र सवंगडी हे प्रेम करीत असले तरी मनाच्या तळाशी रीतेपण सतत जाणवते. घरात, शाळेत, सहलीत अथवा प्रवासात तो आपल्या कुटुंबाला विसरू शकत नाही. 'ओझं'



14861

कथेतील 'आई' ही कविता शिकवितानाचा प्रसंग फारच भावनिक असून जादूमय वाटतो. अशावेळी लंपनला भूतकाळातील आठवणींचा मोह अनावर होवून तो अंतर्मुख झालेला दिसतो. पण याचबरोबर प्रत्यक्ष आई आल्यानंतर त्याच्याकडे लक्ष न दिल्याने, मनाच्या झालेल्या उद्विग्न अवस्थेत तो म्हणतो, ''मला असं वाटायला लागल की, हे सगळे लोक माझ्यापासून आगगाडीच्या रूळासारखे दूरदूर जात आहेत आणि ते परत कधीच येणार नाहीत.''[५] ही लंपनची भावना व विचार करण्याची क्षमता या दोन्ही गोष्टी लक्षात येतात. परंतु आईविषयीचा गैरसमज दूर झाल्याने पुन्हा तो सारे विसरून एकरूप पावतो व भावंडाच्या संगतीत रमतो.

लंपन जितका हळवा आहे तितकाच समंजस व विचारी आहे. मित्र-परिवार, नाती-गोती, समाज, संस्कृती यांच्याबरोबर असणारी आपली कर्तव्ये व्यवस्थित पार पाडताना दिसतो. मात्र काही वेळा लंपनचे मन जणू काही वाळवंटाप्रमाणे भकास व उदास दिसत असले तरी एक गुणी मुलगा अशीच त्याची प्रतिमा वाटते. एखादी न कळत त्याच्या हातून चुकीची गोष्ट झाली तर लंपनचे मन अस्वस्थ होते. 'वनवास' कथेत केवळ आपल्यामुळे आजी बाबूरावला रागवली ही गोष्ट लंपनच्या बालसुलभ मनावर परिणाम करते व त्यांच्या मनास पश्चाताप वाटतो.

लंपन लहान असला तरी अरबाट चिल्लर मित्रांचाही त्यास लळा आहे. या सर्वात 'सुमी'त्याला आवडते. तिच्याशिवाय त्यांच्या मनात विचार येत नाही. उलट, सुमी जवळ असणे म्हणजे त्याला आधार वाटतो ही त्यांच्या मनातील एका वेगळ्या विचारांचा अविष्कार घडवते व यातून भावनिक, विशुध्द प्रेम निर्माण होवून एकमेकांशिवाय सारे अपुरे वाटते. सुमीचा स्पर्श, तिचे सौंदर्य व तिचा सहवास लंपनच्या मनात सतत आनंदी वातावरण निर्माण करते. यामध्ये लंपनच्या मनातील प्रेमभावना सतत फुलताना दिसून येते. तर दुसरीकडे लंपनचे मन सुमीकडे धाव घेताना व प्रेमाचे धडे गिरविताना दिसते.

एकूणच 'वनवास' कथासंग्रहातून लंपनचे मन हे बालविश्वात रमणारे मित्राच्या सहवासात गुंतून गेले आहे. समाजात घडणाऱ्या चांगल्या वाईट गोष्टीची जाण त्यास नसते परंतु या सर्वातून निर्व्याज आनंदाची भावना लंपनच्या मनात झिरपताना दिसते.

'पंखा' कथासंग्रहातून लंपनचे मन व त्याच्या भावविश्वाचा लहानपणीच पोक्तपणा

दिसून येतो. यामध्ये लंपन प्रामुख्याने दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद मानून मदत करताना दिसतो. त्याचप्रमाणे दुंडाप्पा, बाबूराव, सुरेंद्रनाथ हत्तरगी, सांबप्रसाद जांबोटकर, टी.जी. कासारगोड इ. व्यक्तींच्या गुणदोषासहित त्यांना स्विकारणे यात त्यांच्या मानसिकतेचे वेगळे दर्शन दिसून येते. त्यागात प्रेम असते, स्वार्थात नाही ही सूक्ष्म जाणीव तो जाणून आहे. दुसऱ्यांच्या मनांचा विचार करणारा लंपन इथे आपणास दिसतो. 'पंखा' कथेतील सावकाराच्या कपटी वागण्याचा व स्वतःची बायको व मुलगी रतन बद्दल कसलीच काळजी नसल्यामुळे, लंपनला त्यांच्या परिवाराबद्दल सहानुभूती वाटते. ''आमची आई आता फार दिवस जगणार नाही' अस रतन म्हणाली होती.''[२] यामुळे साहजिकच लंपनच्या बालसुलभ मनाला दुःखाची अनुभुती मिळते. तर स्वतःच्या कुटुंबाबद्दल हेवा वाटतो. 'ग्रंथ' कथेतील 'मन्याशेट'च्या झालेल्या गूढ मृत्युने तो गर्भगळीत झाल्याचे दिसते. ''आम्ही तिथंच उभे राहिलो. छातीत धडधडायला लागलेलं''[३] यातून त्यांच्या मनाची केविलवाणी अवस्था लक्षात येते.

लंपनचा स्वभाव, आलेले अनुभव व शिकता शिकविताना झालेलं जीवनाच वास्तव दर्शन. या साऱ्यात लंपन नेहमीच विचारी, अभ्यासू, गूढ असाच शेवटपर्यंत दिसला आहे.

## सुमी :-

लंपनच्या शेजारी राहणाऱ्या गंगूआजीची नात ही सुमी आहे. तिचे मूळ नाव सुमित्रा हळदीपूर असे आहे. परंतु 'वनवास' व 'पंखा' कथासंग्रहात सुमी नावानेच जास्त प्रकट झाली आहे. दोनही कथासंग्रहातील प्रमुख नायिका व लंपनच्या भावविश्वातील महत्वाचा केंद्रबिंदू सुमी आहे. मनाने प्रेमळ, वागण्यात सोज्वळपणा, बोलण्यात सरस्वतीचा वास आणि सर्वात महत्वाचे म्हणजे कर्तव्यदक्ष मुलगी, खऱ्या मैत्रीची साक्ष अशा विविध गुणांनी ती परिपूर्ण आहे.

दोन्ही कथासंग्रहात सुमी वावरताना जराशी अल्लड व विचारी वाटते. शेजारी रहायला आलेल्या लंपनवर तिची अत्यंतिक माया व प्रेम आहे. परंतु मनाने ती धाडसी आहे. या ना त्या प्रकारे ती सतत लंपनच्या सहवासात राहण्याचा प्रयत्न करते. वयाने सुमी लंपनपेक्षा एक दोन वर्षानी मोठी असली तरी लंपनच्या व्यक्तिमत्वावर प्रसन्न असून तिच्या मनात प्रेमाच्या अल्लड भावनेने शिरकाव केलेला दिसतो. लंपनने खूप अभ्यास करावा तसेच त्याने केवळ

आपल्यावरच प्रेम करावे यातून सुमीच्या मनात प्रेम या संकल्पनेची बीजे पहावयास मिळतात. आपल्या सौंदर्याच्या जोरावर लंपनला ती आकर्षित करू पहाते. 'अर्थ' कथेत प्रेमविषयक कादंबरी वाचायला देणारी ती एकप्रकारे ती प्रेमदेवताच वाटते. यातून केवळ लंपन आपला बनून राहावा हिच तिची विशुध्द भावना स्पष्ट होते. इतर मुलींप्रमाणे नटणे मुरडणे यास सुमीचा अपवाद दिसून येत नाही. मात्र दोघांच्या प्रेमात मांगल्याची, पावित्र्याची स्पष्ट रेषा जाणवते.

प्रेयसी या नात्यापुरती सुमी वावरताना दिसली तरी ती बंदिस्त दिसत नाही. कर्तव्यनिष्ठपणा व सुसंस्काराचा ठेवा जतन करताना दिसते. सामाजिक बांधिलकी, संस्कृती याला शोभेल असेच शुध्द आचरण तिच्यातून दिसते. हजरजबाबीपणा व समयसूचकता तिच्यामध्ये दिसते. आपल्या अडचणी बाजूला ठेऊन दुसऱ्यांना मदत करावी एवढी विशालता तिच्याजवळ आहे. सर्वांना आपलं म्हणण्याच्या तिच्या स्वभावामुळे सुमीवर सर्वांचे प्रेम आहे. 'फुलाची गोष्ट' या कथेत ''आजीऽऽ हॅपी बर्थडे टूऽऽऽ यूऽऽऽ''[४] ही शुभेच्छा दयायला ती विसरत नाही. त्याच्या उलट तिच्या मनाची व्यापक विशालता दिसून येते. सुमी वयाने लहान असली तरी थोरामोठ्यांचा मान सन्मान करण्यात पुढे आहे. दुसऱ्यास विशेषत: लंपनला वेळोवेळी आधार देवून त्यांच्या दु:खात सहभागी होवून ती त्याला निर्व्याज आनंद देण्याचा सतत प्रयत्न करते.

लंपनने आपल्या खेरीज दुसऱ्या कोणाकडे पाहू नये असा नेहमीच तिचा अट्टाहास दिसतो तर दुसरीकडे लंपनशी एखादया मुलीने मैत्री करण्याचा प्रयत्न केला तर ती भांडायला मागे पडत नाही. यामधून सुमीच्या वेड्या मनाची व खऱ्या प्रेमाची साक्ष दिसून येते. एक प्रकारे तिचे मन लंपनमध्ये एकरूप झाल्याचे दिसते. ''मघाशी चंपानं सांगितलेली सगळी गाणी म्हणालास ना? माझं मात्र म्हणाला नाहीस!''[५] असे लटक्या रागाने लंपनला सुनावणेस ती मागे पहात नाही. उलट यामधून तिचा वक्तशीरपणा व मनातील धाडसच दिसून येते.

'वनवास' व 'पंखा' या दोन्ही कथासंग्रहातून सुमीचा वापर असला तरी तिचे मन नेहमीच लंपनमध्ये गुंतल्याचे व काळजी घेताना दिसते. आपल्या दु:खांना, अडचणींना बाजूला सारून लंपनच्या सुखासाठी ती प्रयत्न करते. मनाने चंचल, जराशी अल्लड अशी जरी ती वाटत

असली तरी तिचा ठाम विश्वास, प्रबल मनोबल, सालस वृत्ती यामुळे दोन्ही कथासंग्रहातून तिचे मन लंपनभोवती गुरफटल्याचे दिसते. तसेच समाजातील प्रत्येक घडणाऱ्या घटनांचे निरिक्षण करून वागावे कसे इतपत तिच्या मनाचा पोक्तपणा आपणास दिसून येतो.

**आई :-**

"घार हिंडते आकाशी। तिचे चित्त पिलापाशी।।" अशा उक्तीप्रमाणे लंपनच्या आईच्या उद्विग्न मनाची अनुभूती दोन्ही कथासंग्रहातून ठळकपणे नजरेत भरते. पोटचा गोळा आपल्यापासून दूर असावा असे कोणत्याच आईला वाटत नसते. परंतु काहीवेळा दुसऱ्यांच्या सुखासाठी आपल्या भावनांना आवर घालून मुलांच्या वियोगाचे दु:ख पचविणारी लंपनच्या आईसारखी आई एखादीच पहावयास मिळते.

आई वडिलांच्या इच्छेखातर लंपनला बेळगावला शिकायला ठेवल्यामुळे घरातील रितेपणाची सल तिला टोचत असते. लहान मुलाला आईच्या प्रेमाची, मायेची ऊब हवी असते याची जाण तिला असून देखील आपल्या तिने आवर घातल्याचे दिसते. यामधून 'केवळ दुसऱ्यांसाठी झिजणे म्हणजे जीवन' असा व्यापक दृष्टीकोन प्रत्ययास येतो. लंपन लहान आहे. त्याच्यावर योग्य संस्कार होणे गरजेचे आहे. सतत एकाकी राहणेमुळे कोडगा होईल, हट्टी बनेल याची तिला काळजी आहे. लंपन आपल्यापासून दुरावू नये, आपल्यावरील प्रीति अधिक दृढ व्हावी असाच तिचा प्रयत्न आहे. एक सूक्ष्म अवलोकन करणारी, व मुलांच्या बालसुलभ मनाचा विचार करून सर्वतोपरीने मिळालेल्या वेळेत भरपूर प्रेम करताना दिसते. 'ओझं' कथेत लंपनकडे मैत्रिणींच्या गराड्यातून लक्ष न दिल्यामुळे तो दुखावला असेल ही भावना तिला सहज कळते. साहजिकच अशा कोणत्याही मुलाला आपल्या आईबद्दल राग येतो मात्र मुलाचा राग क्षणार्धात आपल्या मायेने कसा विझवावा याचे गुपित लंपनच्या आईद्वारे कळते - "सकाळपासून मी तुझ्याजवळ आले नाही, तुझ्याशी बोलले नाही, तुझ्याकडं नीट पाहिलही नाही. होय ना?"[६] असा सवाल करून मुलाची समजूत काढणारी मुलाची मानसिकता लक्षात घेऊन हळूवार प्रेमाची फुंकर घालून तिने आपले निगगस प्रेम बहाल केल्याचे स्पष्ट होते व सुजाण, समंजस आईपण सिध्द करते.

वास्तविक लंपन व आई यांचा संबंध उभ्या आयुष्याचा परंतु जसा मासा पाण्याविना तळमळतो तशीच दोघांची अवस्था वाटते. बिट्टया व मनी बरोबर असताना लंपनची उणीव तिला नेहमीच वाटते. तिन्ही मुलांना सारखेच प्रेम देण्याकडे तिचा कल दिसून येतो.

केवळ लंपनभोवतीच तिचा जीव आहे असे नाही तर एक यशस्वी पत्नी, यशस्वी मुलगी व यशस्वी आई ती झाली असल्याचे दिसते. आई-वडील, नवरा, नातीगोती व समाजातील संस्कृती या सर्वांच भान तिला आहे. मात्र लंपन जवळ नसलेमुळे मुलाविषयीची अखंड ओढ तिच्या मनात असल्याचे दिसते व यामधून काव्यकलेचा नाद तिला जडला असावा असे वाटते. सर्वच परिने विचार करताना लंपनच्या आईचे मन हे विशाल व व्यापक वाटते. समाजातील नाना प्रवृत्तींना स्विकारून, माणूसकीचा वसा, प्रेम, जिव्हाळा, परोपकारता अशा सर्वच बाबतीत तिच्या मनात वात्सल्य, कारूण्य व प्रेमच दिसते.

**बाबा :-**

समाज व्यवस्थेत 'वडिल' स्थानास अत्यंत महत्व असते. मुलं-बायको, प्रपंच व नाती-गोती या सर्वांची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडणे ही प्रत्येक पुरूषाची कसोटी असते. मुलांचे उज्वल आयुष्य घडवणेत वडिलांचे आचार, विचार, संस्कार यांचा वाटा मोठा असतो हेच सत्य आहे. आईची प्रेमाची हाक व वडिलांचा धाक यामुळे मुलाचे उज्वल जीवन सुखकर होत असते. परंतु याहून वेगळा स्वभाव लंपनच्या बाबतीत दिसून येतो.

मूळातच लंपनच्या वडिलांचा पिंड हा सूज्ञ साहित्यिकाचा असल्याने समाजात, घरात, मुलांच्यात घडणाऱ्या सुप्त घटनांचे अवलोकन त्यांना होत असते. 'वनवास' व 'पंखा' या कथासंग्रहातून हे पात्र थोडे वावरले असले तरी या पात्राखेरीज कथासंग्रह अपूर्ण वाटतील. उच्च संस्कार व शिक्षण या दोन्ही बाबीमुळे त्यांचा स्वभाव शांत, संयमी वाटतो तर वृत्ती अभ्यासकांची. साहजिकच आपली कर्तव्ये पार पाडताना कोणीही दु:खी राहू नये याची नेहमी काळजी घेत, घर नेहमी हसत खेळत ठेवण्याचा ते प्रयत्न करताना दिसतात.

लंपन आपल्यापासून दूर आहे. कदाचित त्याच्या मनात आपल्या विषयीची ओढ कमी होईल ही भावना मनात घर करून असल्याने मित्राप्रमाणे लंपनशी वागून,

अतिशय सामंजसपणे त्यांच्या गळी सत्य उतरवताना दिसतात. मुलाच्या वियोगाचे दु:ख त्यांनाही असह्य होते म्हणून ते वारंवार त्याला भेटावयास जातात. एवढेच काय जाणे शक्य नसल्यास पत्रांच्या माध्यमातून मुलाशी प्रेमाने हितगुज करून आपले प्रेम ते त्याद्वारे देताना दिसतात. यामधून त्यांच्या मनाची उद्विग्नता व मुलाविषयीची व्याकुळता लक्षात येते. कुटुंबात घडलेली लहान सहान गोष्ट सुध्दा मुलापासून लपवत नाहीत. उलट प्रेमाचा अखंड धागा ते टिकवून ठेवताना दिसतात. जणू मुलगा आपल्या जवळच आहे व मुलाला देखील आपले वडील दूर नाहीत हे निरागस मनाने पटवून देतात. ''तू आमच्या सर्वांच्यापासून दूर असलास तरी आमच्या सर्वांच्या मनांत नेहमी असतोस. आम्हीही तुझ्या मनांत असणार याची खात्री आहे.''[७] यामधून केवळ त्यांच्या मनातील सुप्त भावनांचा अविष्कार वाटतो. समाजातील विविध कार्यक्रमांना हजर असणे, आपल्या सासू सासऱ्यांना योग्य स्थान देणे, पत्नीची काळजी घेणे एवढेच काय परंतु अरबाट व काव्यवेड्या मित्राचा त्रास देखील आनंदाने स्वीकारत, मित्र अकोळकर, टोपीकर हे आगाऊ प्रवृत्तीचे असले तरी त्यांना समजावून घेवून त्यांच्याशी वागताना त्यांच्या समंजस मनाचा साक्षात्कार दिसतो. यामुळेच समाजात त्यांनी अढळ स्थान निर्माण केले आहे. वाचन, मनन, चिंतन व लेखन हे त्यांचे छंद असून त्यांच्या मनावर साहित्याचा परिणाम दिसतो.

एकूणच लंपनचे बाबा म्हणून येणारे पात्र हे समंजस, विचारी असेच असून त्यामधुन प्रेम, जिव्हाळा व एका यशस्वी साहित्यिकाच्या मनातही यशस्वी वडीलांची भूमिका पार पडावी याच दृष्टीने ते सतत प्रयत्नशील वाटतात.

### लंपनचे आजी-आजोबा :-

लहान मूल म्हणजे मातीचा गोळा, जसा आकार दयावा तशी मूर्ती घडत असते. हीच मुख्य विचारधारा लंपनचे आजोबा (राघोबा) व आजी (पार्वती) यांच्यामध्ये दिसून येते. 'वनवास' व 'पंखा' या दोन्ही कथासंग्रहातून आपल्या नातवाच्या उज्वल भविष्यासाठी, त्यांच्यावर योग्य संस्कार घडवणेसाठी दोघेही सतत प्रयत्नशील वाटतात. तळहातावरील

फोडाप्रमाणे लंपनला संभाळत आहेत. जणू लंपनचे भावविश्व सुरेख घडवणे हाच त्यांचा प्रधान हेतू आहे.

लंपन लहान असून देखील केवळ आपल्या आग्रहास्तव तो आपल्याकडे राहतो आहे या भावनेने ते दोघेही सुखावलेचे दिसतात. म्हातारपणी घरात लहान मुलाचे अस्तित्व असणे म्हणजे आनंदाला कमी नसते हा दोघांच्या मनाचा कयास बरोबर वाटतो. नातवाच्या सहवासात दु:ख हलके होईल एवढा त्यांचा स्वार्थ यामधून आपणास पहावयास मिळतो.

लंपन लहान आहे. लाजाळू, गंभीर, कमी बोलका असल्यामुळे त्यांच्यावर दोघांचेही लक्ष असून सतत ते काळजी घेताना दिसतात. आजी व आजोबा लंपनच्या दु:खावर व त्यास घरची आठवण होऊ नये यादृष्टीने प्रयत्न करताना दिसतात. मुळातच त्यांच्या घरात लंपनल लहान मुलगा असल्याने ते दोघेही त्याच्यावर अत्यंतिक प्रेम करतात. शाळा, अभ्यास, खेळ इ. सर्वच गोष्टीत लंपन अग्रभागी असावा अशीच त्याच्या मनाची धारणा दिसून येते.

सुखाबरोबर दु:ख, प्रेमाबरोबर कठोर शासन या गोष्टींना ते अग्रक्रमांक देतात. आजोबांनी मुळातच शासकीय दप्तरात नोकरी केल्याने त्यांचे वागण्यात विशिष्ठ शिस्त जाणवते. लंपनने केलेला दंगा असो अथवा अभ्यासातील कुचराई असो लंपनला शासन करताना ते मागे पुढे पहात नाही. 'भेट' कथेत आजोबांना परगावी जाण्याचा आलेला योग व यामध्ये, ''लंप्या, बेट्या सांभाळून राहा. आज्जीला त्रास देऊ नको. तिला त्रास वगैरे देशील तर परत आल्यावर दाखवतो तुला करामत!''[८] यामधून केवळ प्रेमाने दिलेला सज्जड दम व्यक्त होताना दिसतो. प्रेम आणि राग या दोन्ही बाबीत समतोल आजोबांच्यातून स्पष्टपणे जाणवतो.

आजोबांचा जितका लंपनवर जीव आहे तितकाच आजीचाही आहे. मुलीच्या मुलाविषयीचे वात्सल्य तिच्यामध्ये नेहमीच पहावयास मिळते. घरातील कामे करून लंपनवर लक्ष देण्यात कमी न पडता उलट लंपनने आगाऊपणा केला तर धपाटे दयायलाही ती कमी करत नाही. या रागावण्यातून लंपनने चांगले वागावे एवढीच तिची इच्छा आहे.

आजी व आजोबांचे एकमेकांवर अतिशय प्रेम असल्याने वृध्दापकाळातही ते एकमेकांची काळजी घेतात. तर कधी लंपनच्या सानिध्यात हसत खेळत जीवन रमवतात.

समाजात त्या दोघांना विशिष्ट स्थान असल्याने, प्रतिष्ठा असल्याने, आजी व आजोबा नेहमीच संस्कृतीला धरून आचरण करताना दिसतात. आपल्याला कोणीही नावे ठेऊ नये असाच त्यांच्या मनाचा व्यापक दृष्टीकोन आहे. नोकर असो वा समाजातील व्यक्ती त्याचा पाहुणचार, आदरातिथ्य, प्रसंगी कठोर शासन व माया देण्यास ते विसरत नाहीत. 'सफाई' कथेत बाबूरावने केलेल्या चुकीबद्दल आजोबा त्यास शासन म्हणून हाकलून देण्याचा प्रयत्न करतात. यावेळी आजीच त्या घटनेवर पांघरूण घालून बाबूरावची चूक पोटात घालते. ''बाब्या, इतक्या वर्षाचा आपला संबंध आहे. जे झालं ते झालं.''[१] यामधून आजीच्या मनाचा मोठेपणा लक्षात येतो.

भारतीय संस्कृतीत आदर्श स्त्री व पुरूष म्हणून आजी व आजोबा हे प्रतिरूप वाटतात. परोपकारता, समाजकल्याणाची भावना, यशस्वी संसारावर असणारी भिस्त, आपली माया, प्रेम, जिव्हाळा या सुरेख धाग्यांची गुंफण त्यांच्यामध्ये पहावयास मिळते.

थोडक्यात चांगल्या गोष्टीसाठी बक्षीस व वाईटांना शासन हे त्यांच्या मानसिकतेचा पैलू आहेत. तर दुसरीकडे लंपनच्या भावविश्वाला सुरेखपणे फुलविण्याचा मनाने घेतलेला कणखर ध्यास प्रत्येक कथेतून दिसतो. लंपनच्या भावविश्वात गुरफटल्याने कधी लहान मुलाप्रमाणे, प्रसंगी मोठ्याप्रमाणे आचरण दोघांच्याही मनातून उन्मळून येताना दिसते. मनातील प्रांजळपणा व स्पष्टवक्तेपणा व समयसूचकता या सर्वच स्तरावर लंपनचे आजी-आजोबा यशस्वी आजी-आजोबा वाटतात.

## सुमीचे आजी-आजोबा :-

'वनवास' व 'पंखा' या कथासंग्रहातून फार थोड्या प्रमाणात सुमीचे आजी आजोबांचे चित्रण आले आहे. आजीचे नाव गंगूबाई तर आजोबांचे चिंत्या (चिंतामणी) असे आहे. मात्र दोघांचे स्वभाव, गुणदोष निराळे आहेत.

सुमीच्या आजोबांचे सुमीवर अत्यंत प्रेम असून त्यांना दिशाचे वेड असल्याचे दिसते. ज्याला दिशा माहित नाही त्याच्या जीवनात काहीच अर्थ नाही असे त्यांचे स्वतःचेच मत आहे. पानाचा तोबरा तोंडात भरून एखादयास खवचटपणे बोलणे, चिडवणे यातून त्यांच्या मनात आनंदाच्याच उकळ्या फुटतात. एकंदरीत जीवनाचा निखळ आनंद लुटताना थट्टा

मस्करी करणे हा त्यांच्या मानसिकतेचा घटक स्पष्टपणे नजरेत भरतो.

सुमीबरोबर त्यांचे लंपनवर देखील प्रेम व माया आहे. त्यांच्यावर योग्य संस्कार व्हावेत एवढाच त्यांचा उदात्त हेतू यामागे दिसून येतो. नात सुमी व लंपनला वेळोवेळी अभ्यासाचे पाठ दयायला ते विसरले नाहीत. याचबरोबर तासन् तास गप्पा गोष्टी करण्यातच त्यांना अधिक रस वाटतो. कधी प्रेमाने तर कधी कटोरपणे वागताना दिसतात. 'वीज' कथेत लंपनला शाळेतून घरी आल्याचे पाहताच,'आँ? घरीच? काय शाळा विकली बिकली काय मास्तरांनी?''[१०] अशा प्रकारचे खवचट बोलण्यास त्यांचे मन कचरलेले नाही उलट यामधून त्यांचे मन फुलाप्रमाणे मऊ आहे तर प्रसंगी दगडासारखे कठोर वाटते. परंतु त्यांची पत्नी, नात, शेजारी पाजारी यांच्यावर माया दिसून येते.प्रसंगी मनाने विचित्रासारखे वागणे असे त्यांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू दिसतात.

सुमीची 'आज्जी' हे पात्र तुरळक स्वरूपात पहावयास मिळत असून एक साध्वी स्त्री असेच तिचे पात्र आहे. निर्मळ, पवित्र मन याचबरोबर संस्कृती व समाज व संसार या वलयाभोवतीच तिचे मन गुरफटल्याचे दिसते. वारंवार बडबडत राहणे, परंतु कोणत्याही गोष्टीवर रागावू नये यामधून केवळ आज्जीच्या मनातील संस्काराची प्रचिती येते. राग, लोभ, मोह, मत्सर याचा कुठेही स्पर्श झालेला दिसून येत नाही. उलट 'शोध' या कथेत साखळी हरवली असताना देखील साऱ्या गोष्टी दमाने घेवून झालेल्या गोष्टीवर गांभीर्याने विचार करणाऱ्या आजीच्या मनात सुप्त जाणतेपणाचा अविष्कार दिसून येतो.

आजी व आजोबांच्या स्वभावात, विचारांत भिन्नता दिसून येत असली तरी प्रसंगाशी मिळते जुळते घेणे, आपल्या परीने दुसऱ्यांना मदत करणे असाच त्यांचा मानसिक पिंड दिसतो. आजोबांचा खवचटपणा दिसून येत असला तरी प्रांजळ मन लपून राहत नाही. दोन्ही पात्रामधून उत्तम शेजारी कसा असावा याचे ज्वलंत उदाहरण लेखकाने चित्रीत करून जीवनात काय मिळवायचे आहे? फक्त माणुसकी! हाच विचार या पात्रामधून प्रकर्षाने जाणवतो.

**बाबूराव :-**

बाबूराव हा लंपनच्या घरातील नोकरमाणूस असून निसर्गाने त्याला सौंदर्यामध्ये विक्षिप्तपणा दिला आहे. परंतु बाबूरावच्या दिसण्यापेक्षा बाबूराव हा माणूस म्हणून फार मोठा वाटतो. याचे मुख्य कारण त्यांच्या मनातील टिकून असणारा प्रामाणिकपणा, जिव्हाळा व आपलं म्हणून काम करणेची सचोटी यावरून त्यांच्या मनाची उंची स्पष्ट होते. यांच्या मराठी बोलण्यात कानडी भाषेचा बाज असल्याने त्यांचे आपल्या भाषेवर प्रेम असल्याचे स्पष्ट होते. स्वच्छ व पवित्र मनाचा माणूस अशीच त्यांची प्रतिमा नजरेत भरते.

वयाने लंपनपेक्षा कितीतरी मोठा असला तरी लंपनच्या सुखासाठी, त्याला आनंद मिळणेसाठी तोही लंपनची काळजी घेतो. त्याची सेवा करताना दिसतो. आपल्याच घरात आपण काम करतो आहे असे तो समजत असल्यामुळेच आजी व आजोबांना त्याच्यावर पूर्ण विश्वास असल्याचे दिसते एवढेच काय परंतु वयाने वाढला तरी लहान लंपनबरोबर खेळणे, गाणी म्हणणे, पिक्चर पहाणे या त्यांच्या छंदामधून त्यांचे निरागस व बालसुलभ मनाचे प्रत्यंतर झालेले दिसून येते. आपुलकीची भावनाच त्यांच्या मनात प्रबळ असल्याचे दिसते.

बाबूराव जितका प्रामाणिक प्रेमळ आहे तितकाच मनाने भोळसर वाटतो. साहजिकच या भोळसटपणाच्या गुणामुळे पदम्माका नावाच्या स्त्रीच्या मोहात पडतो व स्वत:ची फसवणूक करून घेताना दिसतो. नाहीतर एखादा चतुर माणूस असल्या मोहात पडल्याचे दिसून येते का? बाबूराव या प्रकरणात फसतो परंतु आजी व आजोबांची त्यास भिती असल्याने तो घरी येण्याचे धाडस करीत नसून पश्चातापाच्या भोवऱ्यात होरपळताना दिसतो. यामुळे साहजिकच त्याच्या मनातील खजीलपणा सिध्द होताना दिसतो. "ती बया मला एकदा बाजारात भेटली. ती इरकुंबीची. मी एक नंबरचा गाढव! मी तिच्या नादी लागलो. मला ..."[११] अशा प्रकारे आजोबा आजीपुढे चूक मान्य करणाऱ्या बाबूरावचे मन हे घडलेल्या चुकीबद्दल क्षमा मागण्यास कचरत नाही. उलट यातून त्याच्या मनाचा विनम्रपणाच जाणवतो.

वाईट जगाची प्रचिती नसणारा व लहान मुलासारखे केवळ निरागस मनाने सर्वांशी वागणारा बाबूराव 'वनवास' व 'पंखा' या दोन्ही कथासंग्रहातून सतत लंपनबरोबर

वावरताना दिसतो. ओझं, वनवास, वीज, भेट, खेळ, साखळी, समज, पान, सफाई, शोध आदी कथांमधून त्यांच्या भावविश्वातील प्रांजळ मन वाचकांना वेडे करून सोडते. लंपनच्या कुटुंबासमवेत आयुष्य काढणे व सर्वांशी प्रेमाने वागणे एवढ्यापुरते त्याचे मन सदैव गुरफटलेले दिसते.

## 'वनवास' कथासंग्रहातील प्रमुख पात्रांचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास :-

### जंब्या कटकोळ :-

जंब्या कटकोळ हा लंपनचा मित्र म्हणून लंपनच्या आयुष्यातील महत्वाचा साक्षीदार आहे. आडदांड स्वभाव व कोणत्याच गोष्टीचा विचार न करता वागणाऱ्या जंब्यामुळे त्यांच्या नादी सहसा कोणी लागत नसल्याचे दिसते. मुळातच गुंड प्रवृत्तीच्या वृत्तीमुळे त्याला सर्व मुले घाबरत. याचा तो फायदा घेऊन वर्गात, रस्त्यात कोठेही खुशाल दमदाटी केल्याने, खोडकर मन नजरेत येते. मुक्तपणे वावरणे हा छंद असून त्यांची मानसिकतासुध्दा मुक्तच वाटते. परंतु आपण काय करतो? कशासाठी करतो? याचे त्याला भान नसल्याने अल्लड मनाचा टारगट मुलगा अशीच सर्वत्र प्रतिमा दिसते. मारामाऱ्या करणे, घरातील लोकांना उध्दट बोलणे एवढ्यापुरताच जंब्या मर्यादित नसून त्याच्या मनात खरी निखळ मैत्री जाणवते. त्याचे आजोबा पैलवान असल्यामुळे साहजिकच तो ही तसाच असतो. पैलवान माणसाची मन निगरगट्ट असतात परंतु जंब्याचे तसे नाही. आपल्या आजोबांच्या मित्राचा नातू लंपन आहे हे कळल्यानंतर इतरांप्रमाणे लंपनबरोबर न वागता, उलट त्याची काळजी घेताना दिसतो.

जंब्याचा स्वभाव विक्षीप्त असला तरी त्याच्या मनात प्रेम, जिव्हाळा दिसतो. जर कोणी लंपनला हात लावला तर कठोरपणे शासन करण्यास तो मागे पुढे पहात नाही. यावरून त्याच्या मनातील मित्र प्रीतिचा प्रत्यंतर येतो. जीवनाचा निखळपणे आस्वाद घेणे तसेच मित्रासमवेत मौज मस्ती करावी अशीच त्यांच्या मनाची धारणा आहे.

### केबी :-

केबी ही एक लपंनच्या भावविश्वातील महत्वाची स्मरण कडी आहे. स्वार्थापोटी काही

लोक दुसऱ्यास  बळीचा बकरा कसा ठरवतात याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे केबी. तुंगभद्रा नावाच्या सुंदर मुलीबरोबर प्रेमाचे चाळे करू पहाणारा केबी असून प्रेम मिळविण्यासाठी लंपनचा आधार घेताना दिसतो. शाळेतील क्रिकेट टीमचा कप्तान असल्याने आपल्या प्रेमास कोणीही स्विकारेल अशीच त्याची धारणा असून किशोर वयातील भावनांना तो आवर घालू शकत नाही. तासन् तास तुंगभद्राच्या मोहात चकरा मारणारा हा वेडा प्रेमवीर वाटतो. परंतु एखादया मुलीने प्रेमाचा स्विकार केला नाही तर मोठ्या मनाने हार स्विकारण्याची मानसिक तयारीही दिसून येते.

केबीने केवळ स्वार्थापोटी लंपनशी मैत्री केली असली तरी लंपनकडून खऱ्या मैत्रीची साक्ष पटते. तर दुसरीकडे आपण करू पहाणाऱ्या वाईट गोष्टीची सल त्यास बोचताना दिसते. ''लंपू , ते माझं एक स्वप्न होतं. जांग झाल्यावरआपण स्वप्न विसरतो की नाही? मी आता चांगलाच जागा झालो आहे बघ! तुला ते सगळं समजायचं नाही.''[१२] यावरून आपणास केबीच्या अंर्तमनाचा अविष्कार दिसून येतो. इतरवेळी सायकलवरून मुलींना त्रास देणाऱ्या केबीच्या मनातील सुप्त विचाराचे इथे दर्शन होते.

प्रांजळ, मनात काही न ठेवणारा, प्रसंगी स्वार्थापोटी दुसऱ्यास बळीचा बकरा करू पहाणारा, तर कधी मैत्रीसाठी हात पुढे करून वास्तवतेशी इमान ठेवणाऱ्या केबीच्या मनाचे पोक्त, हुशार, धुर्त असे कितीतरी पदर स्पष्ट होताना दिसतात.

**सावकार :-**

वास्तव सत्य बाजूला ठेऊन खोट्या भ्रमात आपले जीवन कंठणारा सावकार असून आळशी प्रवृत्तीचा असल्याचे दिसते. स्वत: सावकारशाहीचा खोटा आव आणून श्रीमंतीच्या थाटात वागणे व दुसऱ्यांची लुबाडणूक करण्यामुळे समाजाचा त्यांच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन एक लबाड, कपटी अशीच प्रतिमा सावकाराची दिसते.

कुटुंबाची व त्यातील सदस्यांची त्याला कसलीच पर्वा नाही. घरंदाजपणाच्या नावाखाली त्याने आपली बायको व मुलगी यांना गुलामाची बेडीच घातल्याचे दिसते. खिशात पैसे नसताना देखील आपण इतरांहून निराळे आहोत. श्रीमंती आपल्याकडे पाणी भरते असा समज तो इतरांना करून देत असल्याचे जाणवते. परंतु समाजाला व लोकांना

त्यांचा हा स्वभाव माहित असल्याने केवळ रिकामटेकडा, लालची मनोवृत्तीचा त्यास जाणत आहेत. स्वत:च्या आई-वडिलांना घराबाहेर काढणाऱ्या, भावंडांना देशोधडीला लावणाऱ्या सावकाराचा पोकळ अहंकार यामधून दिसतो. अंगात कर्तृत्वाचा अभाव मात्र राजासारखे वागावे ही धारणा त्याला शेवटी जुन्या बाजारात 'पंखे' विकण्यास भाग पाडते. सत्य दडत नसते हे जरी खरे असले तरी सावकारावरती आलेली वेळ दुसऱ्या कोणावर येऊ नये हेच खरे.

लोभाच्या मोहापायी तसेच कष्ट न करण्याच्या वृत्तीमुळे सावकाराची प्रतीमा मलीन झाल्याचे स्पष्टपणे आपल्या नजरेत भरते. बेजबाबदार, आळशी, हलकट मनोवृत्तीचा, बिनकाम्या, आरामदायी जीवन जगण्याची आस असलेला अशीच सावकाराची यथायोग्य व्याख्या होईल.

**मन्याशेट :-**

कोणत्याही माणसाला परिस्थिती घडवत असते. त्याच्या मागील घडलेल्या घटनांचा दूरगामी परिणाम मनावर होवून एकतर तो माणूस शहाणा होतो परंतु त्याच्या मनात असणारी जिद्द, चिकाटी कायम टिकून रहात असते. मन्याशेट अशाच एका विशिष्ट परिस्थितीत अडकून स्वत:स हरवून घेतो. समाज त्याला वेडा मन्या याच दृष्टीने पहातो. परंतु हा मन्याशेट वेडा आहे निसर्गाचा, साहित्याचा. आपल्याच विश्वात रमणारा त्यामुळे त्याच्या भावनांशी एकरूप होणारी माणसं त्याला भेटली नसावीत त्यामुळेच एकेकाळी स्कॉलर असणारा मन्याशेट वेडा झाल्याचे दिसते. घरची श्रीमंती व घरातील वाद यामुळे त्याचे मन उद्‌विग्नतेमध्ये बंदीस्त होवून समाजापासून दूर राहताना आढळते.

समाजाने मन्याशेटला वेडा ठरवले असले तरी लहान मुलांच्यावरील त्याचे प्रेम सतत जाणवते. निसर्गाने वरदान दिलेल्या विविध वस्तुंचा संग्रह व नवीन पुस्तकांची खरेदी करणेचा छंद मन्याशेटने अखंड जोपासल्याचे दिसते. भावनेशी एकरूप झाले तर प्रत्येक मनुष्याच्या अंत:करणातील विविध पदर दिसून येतात. लंपनच्या बाबतीत मन्याशेटचा आलेला सहवास, लंपनच्या मनात निस्सीम प्रेम निर्माण होवून आदर वाटतो.

मन्याशेट वेडा दिसत असला तरी माणुसकीचा लवलेश त्याच्यामध्ये

पहावयास मिळतो. आपल्या मनातील साचून राहिलेल्या भावनांना योग्य न्याय न मिळाल्यानेच मन्याशेटचा दुर्दैवी अंत झालेला दिसून येतो. साहजिकच मन्याशेटचा स्वभाव,पोषाख, बोलण, वागणं समाजाला एक सुखद अनुभव असला तरी 'वेडा मन्याशेट' असाच त्याच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन समाजाकडून बदललेला दिसत नाही.

### निमामावशी व सरला :-

लंपनची मावशी व मासवबहिण या नात्याने निमामावशी व सरला अशी त्यांची ओळख 'पाहुण्या' कथेतून दिसून येते. मायलेकींना आपल्या परिवारातील अस्वस्थपणा यामुळे नेहमीच त्यांना दु:ख होताना दिसते. आपल्या संसारात वकील पतीची साथ नसून केवळ आपल्या संसाराची चिंता तिला असल्याचे दिसते तर मुलगी सरला लहान आहे परंतु वाद, कलह यामुळे कोणास दुखवू नये असा परिणाम तिच्या मनावर झालेला दिसतो.

प्रत्येक कुटुंबात अशी विचित्र परिस्थिती दिसून येत असते. अशावेळी बायका-मुलांना केवळ सुखाची व आनंदाचीच अपेक्षा असते. समाजाला अशा घटनांचे काही देणे घेणे नसून आपल्या समस्या स्वत:ला सोडवाव्या लागतात हेच खरे वाटते.

निमा मावशी व सरला एकाकी पडल्याने त्यांच्या मनात भिती वाटते. लंपनच्या कुटुंबातील सुख पाहून त्यांनाही हेवा वाटतो हे स्पष्टपणे त्यांच्यामधून जाणवते.

### रतन व रतनची आई :-

'पंखा' कथेतील रतन व रतनची आई या दोघी देखील एकाकी, दु:खी जीवन जगताना तसेच समाजापासून दूर व गुलामगिरीच्या दरम्यान जखडलेल्या दिसतात. सुखाच्या, आनंदाच्या उज्वल भविष्याची स्वप्ने समोर असताना त्या मायलेकी हतबल वाटतात.

### पंखा कथासंग्रहातील इतर गौण पात्रे :-

'झांज' कथेतील खंडेराव, कमळी, 'पूल' कथेतील विभाकर तसेच या कथासंग्रहातील सुऱ्या, चंदा, दमयंती ही सर्व पात्रे निरागस वाटतात. तर दुसऱ्या बाजूस यशस्वी संसाराची स्वप्ने पहाणारे खंडेराव, कमळी समाजाने घालून दिलेल्या बंधनात अडकताना दिततात. तर

कथासंग्रहात येणारी लहान पात्रे हे लंपनलचे मित्र असून समाजाचे रितीरिवाजापासून खूप लांब जाताना दिसतात. त्यांचा भविष्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन कोऱ्या पाटीप्रमाणे स्पष्ट आहे.

## 'वनवास' व 'पंखा' कथासंग्रहातील व्यक्तीचित्रांचा सामाजिक दृष्टीने अभ्यासः-

### लंपन :-

'वनवास' व 'पंखा' कथासंग्रहातील प्रमुख पात्र लंपन असून त्याच्याकडे पहाण्याचा समाजाचा दृटीकोन वेगळा आहे. आईपासून दूर व आजोबा आज्जीकडे तो रहायला, शाळेला असल्याने आईच्या प्रेमास तो उपेक्षित आहे. वयाने तो लहान असल्याने प्रत्येकजण त्याच्याकडे सहानुभूतीच्या नजरेने पहाताना दिसतो. सर्वजण त्याच्यावरती प्रेम करीत असली तरी तो आपली मनातील उद्विग्नता साचवून ठेवून दु:ख पचविताना दिसतो. त्यास समाजाकडून खूप अपेक्षा असल्या तरीदेखील आईचा सहवासच त्याला निखळ आनंद देवून जातो.

आजोबा आजीचे लंपनवर अत्यंतिक प्रेम असले तरी देखील लंपन वात्सल्यास भुकेलेला नेहमीच दिसतो. लहानपणात आईपासून आलेला विरह व समाजाने घालून दिलेला साचा या दोन्हीमध्ये त्याचा कोंडमारा होताना दिसतो. मनात दु:ख असताना देखील आईच्या इच्छेखातर तो आजोळी राहून सामाजिक बांधीलकी जोपासण्याचा प्रयत्न करताना दिसतो. दुसऱ्या मुलाप्रमाणे आपल्यावरती सुध्दा आईने भरभरून प्रेम करावे असाच त्याचा दृष्टीकोन आहे. 'ओझं' कथेत आई जेव्हा आपणास भेटावयास येणार व माझ्यावर भरभरून प्रेम करणार ही जाणीव जणू सामाजिक वास्तवतेचे स्पष्ट उदाहरण आहे. मात्र आई केवळ आपल्या भावंडावरच प्रेम करते, माया करते हा लंपनचा दृष्टीकोन चुकीचा ठरल्याचे जाणवते. 'मग आईनं आम्हांला तिघांनाही आपल्यं मिठीत घेतलं.'[१३] यामधून केवळ कोणत्याही आईला सर्व मुलाबद्दल प्रीति समान असल्याचे दिसते.

लंपन वयाने लहान निरागस असून तितकाच गंभीर व विचारी असल्यामुळे तो समाजाचे बारीकपणे अवलोकन करताना दिसतो. समाजात घडणाऱ्या बऱ्या-वाईट घटनांची त्यास हळूहळू जाणीव होत आहे. आजोबा-आजी, आई-बाबा यांच्या नावास गालबोट लागेल

अथवा त्यांची सामाजिक प्रतिष्ठा धोक्यात येईल असे वर्तन त्याच्याकडून होत नाही. समाजात घडणाऱ्या विविध घटना व आईपासून लहानपणीच आलेल्या वियोगामुळे तो निसर्गाच्या व पुस्तकाच्या प्रांतात रमतो. आपले मनातील दु:ख हलके व्हावे यासाठी तो अरभाट व चिल्लर मित्रासमवेत खेळताना दिसतो. खेळणे, प्रवास करणे याचबरोबर समाजातील थोरा-मोठ्यांचा आदर करणारा लंपन समाजात आपली वेगळी प्रतिमा तयार करताना दिसतो. घरगडी बाबूरावला आपल्यामुळे आजाची बोल खावा लागला उलट ''पाऽऽऽपंऽऽऽ केवडा वनवास घडवलो मी तुम्हांलाऽऽऽ''[१४] यामधून बाबूरावची विनम्रता तर लंपनला आपल्या चुकीबद्दल पश्चाताप होवून पुन्हा असे कधी वागणार नाही असे शिक्षणच मिळालेचे वाटते.

'वनवास' व 'पंखा' कथासंग्रहातील दुंडाप्पा, केबी, जी.टी., कासारगाडे, सावकार, जंब्या कटकोळ या पात्रांचे लंपनवरील अत्यंतिक प्रेम व्यक्त झाले तरी त्याच्या प्रेमातून त्याचे समाधान होत नाही. केवळ लंपनच्या वागण्यामुळे समाज त्याला आपला म्हणून स्विकारत आहे. समाजात घडणाऱ्या वास्तव परिस्थितीचे तो सदैव अवलोकन करीत आहे. साहजिकच तो गंभीर व विचारी असल्याने समाजातील स्वार्थी, लबाड, ढोंगी लोकांमधील विषण्णता ओळखून आहे. वनवास कथासंग्रहातून तो केवळ आपल्या हक्कासाठी व झालेल्या गोष्टीवर विचार करताना दिसतो. तरपंखा कथासंग्रहातून इतरांची मने व त्यांच्या सवयीचे निरीक्षण करून आपल्या परिने त्यांना मदत करताना दिसतो. परमेश्वराबद्दलची श्रध्दा व परोपकारता व समाजाशी त्यांची नाळ घट्ट झाल्याची दिसते.

सुमी ही जीवाभावाची मैत्रिण असली तरी समाजाची त्याला भिती आहे व कोणतेही गालबोट न लागता आपल्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन योग्य असावा याची तो ठिकठिकाणी काळजी घेताना दिसतो. वीज, खेळ, चक्र, आदम समाज, शर्यत तसेच पंख कथासंग्रहातील पान, सफाई, ढग, पॅच, शोध, झांज, पूल, पंखा, ग्रंथ या सर्वच कथामधून त्याने समाजातील व प्रत्यक्ष मानवी जीवनात घडणाऱ्या सुप्त जाणीवा व अभ्यास करून काढलेला निष्कर्ष सतत जाणवत राहतो व या माध्यमातून तो सतत सामाजिक बांधीलकी जोपासताना दिसतो.

## सुमी :-

सुमी ही लंपनपेक्षा दोन वर्ष वयाने मोठी असून सूज्ञ व हुशार आहे. त्याचबरोबर तिला समाजातील वास्तव सत्याची जाणीव आहे. वरवरच्या खोट्या प्रेमाची व खऱ्या आपुलकीच्या नात्याची भाषा तिला अचूक समजते. अशावेळी सच्चा साथीदार म्हणून लंपनची ती निवड करताना दिसते. परंतु भावनिक दृष्टीने एकमेकांना आधार बनून राहिलेली निखळ मैत्री व प्रेमास समाज वेगळं नांव देईल याची तिला जाणीव आहे. असे असून देखील लंपनवरचे प्रेम कोठेच कमी न झाल्याचे दिसते. अर्थ कथेत लंपनला प्रेमाच्या सुंदर कल्पनेची जाणीव करताना दिसते. ''लंप्या, कसली चावट पुस्तकं वाचतोस रे तु? सांगू का आता तुझ्या आजोबांना.आण पाहू ते पुस्तक इकडं. ''[१५] असे बोलताना समाजाची, कुटुंबाची तिला भिती असली तरी लंपनला धाकात ठेवण्याचा ती प्रयत्न करताना दिसते.

आजी, आजोबा, लंपन व शाळा एवढेच तिचे विश्व असून समाजाशी तिचे देणेघेणे काहीच नसल्याचे जाणवते. मात्र संस्कृती, चालीरिती, परंपरा यानुसार ती वागताना नेहमी दिसते. लंपनबरोबरच्या सहवासात ती स्वत: हरवून जात असली तरी सतत काळजी घेताना व सतत लंपनच्या सुखदु:खात सहभागी होवून त्याच्या भावविश्वाला आपल्या प्रेमाची नाजूक नात्यात वलयं निर्माण करण्यात ती व्यस्त करून घेत आहे. पान कथेत, ''काय चावट झाला आहेस रे तू? मी डोळे झाकले तर एवढं बाबूरावाना हाका मारायचं काय काम?''[१६] या ना त्या प्रकारे लंपनशी गाढ मैत्री करून त्यांच्या सहवासात सतत रहावे असाच तिचा दृष्टीकोन लक्षात येतो.

सामाजिक दृष्टीने सुमीचा विचार केल्यास लंपन व सुमी यांचे नाते मैत्रीपुरते मर्यादित न राहता विशिष्ट भावनेपलीकडील असल्याचे दिसते. समाजाचा सुमीवर कसलाच परिणाम न होता धीटाईपणाने ती वागताना दिसते व नात्यातील घट्टपणा टिकवून ठेवते. सुमी लंपनभोवतीच गुरफटली असली तरी ती आपली कर्तव्ये जाणून स्त्री धर्माचे पालन करताना दिसते. यावरून तिच्यातील सुसंस्कारपणा व सामाजिक बांधीलकी नजरेत भरते. लंपनचे आजी-आजोबा असो वा बाबूराव, दुंडाप्पा किंवा कोणीही असले तरी त्यांचा मान राखणे, आपुलकीने

वागणे व बोलण्यातील गोडवा या सहज गुणांमुळे सुमी विषयी समाजातील लोकांना आदर वाटावा अशीच तिची प्रतिमा वाटते.

सुमी व्यतिरिक्त लंपनने इतर मुलीशी मैत्री केलेली तिला आवडत नाही. कदाचित तिचे वागणे समाजात घडणाऱ्या गोष्टीचा परिणाम असून आपल्या साज शृंगाराने लंपनला बंदिस्त करता येईल असे सत्य समाजातील अवलोकनावरून तिच्यामध्ये आल्याचे स्पष्ट जाणवते. सुमी नेहमीच आपल्या माणसांची काळजी घेताना, प्रसंगी त्यांच्या सुखदु:खात सहभागी होत असल्याने तसेच दुसऱ्यास मदत करणे या तिच्या स्वभावाने एक सुशील, विचारी व अभ्यासू मुलगी म्हणून समाजाने तिला स्थान दिल्याचे समजते. एकूणच 'वनवास' व 'पंखा' या कथासंग्रहातील प्रत्येक कथेमधून सुमी डोकावताना दिसते. लंपनला घडविण्यात, त्याला मानसिक दृष्टया सक्षम बनविण्यात सुमीचा मोठा वाटा असून त्या दोघांचे नाते समाजाने स्विकारल्याचे प्रत्येक कथेमधून दिसते. घर, शेजारी सवंगडी व थोरामोठ्यांचा आदर आदी सर्व परिपक्व गुणांमुळे समाजात तिची स्वच्छ प्रतिमा टिकून असल्याचे दिसते.

**आई :-**

''स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी'' या ओळीचा आशय लक्षात घेतला तरी त्यामधील कारूण्य ठळकपणे नजरेत भरते. ज्याच्यापाशी आई नाही तो जगातील सर्वात दुर्दैवी मनुष्य.

प्रकाश संतांच्या दोन्ही कथासंग्रहातून प्रकटणारी लंपनची आई मनाने दु:खी अशीच वाटते. मात्र आपल्या दु:खाला ती चेहऱ्यावर न दाखवता मनातल्या मनात सदैव कुढत असते. सर्व मुलांना सारखीच माया देणारी आई आहे. तिच्या मनात कसल्याच स्वार्थपणाचा लवलेश दिसत नाही. परंतु वृध्द आईवडीलांच्या इच्छेखातर आपल्या भावनांना आवर घातला. मात्र मुलाच्या कोमल मनाचा तिने कुठेच विचार केलेला दिसत नाही. भोगापेक्षा त्यागच लंपनच्या आईद्वारे नजरेत भरतो असे असले तरी लंपनला दूर ठेवल्याने ममत्वाचा गळाच दाबल्यासारखे वाटते.

पाण्यात काठी मारल्याने पाणी तुटत नसते तसेच आई व मुलाचे नाते

असते. मुलाच्या भेटीची व्याकूळता आईलाही सतावते. आई ही संपूर्णपणे मुलाशी एकरूप झालेली आढळते. मुलाच्या भावनेचा विचार करून त्याला प्रेम अर्पण करताना तिचे वात्सल्य भरभरून येते. ओझं कथेमधील माय लेकरांचा प्रसंग काळजाला हात घालणारा वाटतो. "त्या गर्दीतही आईच्या डोळ्यांतून आलेल्या पाण्याचा एक थेंब माझ्या गालावर पडला."[१७] या ओळीतून आईच्या दु:खी अंत:करणाची खात्री पटते.

लंपनची आई केवळ लंपनभोवतीच गुरफटली असून तिला सामाजिक जाणीवांची पूर्ण कल्पना आहे. एक उत्तम मुलगी, एक सुशील पत्नी व आई म्हणून तिची कसोटी असल्याचे दिसते एवढेच नव्हे तर समाजात वावरताना आपल्या बोलण्याने कोणीही दुखू नये याची सतत काळजी घेताना ती दिसते. म्हणूनच ती पतीच्या अरभाट व वात्रट मित्रांना कधी बोलत नसल्याचे दिसते केवळ आपल्या पतीच्या प्रेमावरील निष्ठा व प्रामाणिकपणा कायम ठेवताना दिसते. एका भारतीय सुसंस्कारीत स्त्रीला शोभेल असेच आचरण दोन्ही कथासंग्रहातून दिसून येते.

लंपनच्या मनाचा विचार करून त्याच्यामध्ये अखंडपणे कुटुंबाविषयीची ओढ कायम ठेवण्याची धडपड तर दुसरीकडे आपल्या आईवडीलांचा आधार म्हणून तिने यशस्वीपणे जबाबदारी पार पाडल्याचे दिसते. त्यामुळे साहजिकच समाजात तिला विशिष्ठ स्थान प्राप्त झाले असून मनातील भावनांना काव्यकलेत बांधून समाजापुढे वेगळा आदर्श तिने निर्माण केला आहे. देवावरील भक्ती व कुटुंबावरील प्रीति या दोन्ही कसोट्यामध्ये यशस्वीपणे उभी राहून कणखरपणे ती प्रसंगाना सामोरी गेल्याने तिच्या रूपाने समाजाला अभिमान वाटला नाही तरच नवल म्हणावे लागेल.

**बाबा :-**

सामाजिक जाणीवांच्या परिपूर्ण चौकटीत बाबा हे पात्र येत असून लंपनचे वडिल या नात्याने प्रकाश संतांच्या दोन्ही कथासंग्रहातून वावरताना दिसते एक सूजाणपणा विचारी व समाजात घडणाऱ्या घडामोडींचे सूक्ष्म अवलोकन करण्याची मानसिकता त्यांच्यामध्ये पहावयास मिळतो. लंपन आपल्यापासून दूर असल्यामुळे त्याच्या मानसिकतेवर सामाजिक विषणतेबद्दल होणाऱ्या दूरगामी परिणामाची त्यांना चिंता असते. आपल्या कुटुंबामध्ये अखंडपणे

जिव्हाळा कायम राहून सुखाचा संसार व्हावा असा त्यांचा सामाजिक दृष्टीकोन त्यांच्यामधून जाणवत राहतो.

लंपन व स्वत:मध्ये मनाने दुरावा निर्माण होऊ नये यासाठी ते मित्रासारखे त्यांच्याशी गप्पा गोष्टी करताना मनातील साचलेल्या आठवणी त्याच्यासमोर विशद करताना दिसतात. साहजिकच मुलगा म्हणून त्याच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन असून इतर मुलांच्या वडिलांसारखे ते नाहीत. खवचट वाटत नाहीत उलट त्यांच्यामध्ये प्रेमच दिसून येते.

एक वडिल म्हणून जसे ते प्रभावी आहेत तसेच उत्तम पती म्हणून त्यांचा इथे विचार करावा लागेल. आपल्या पत्नीचा आनंद कशात आहे? तिला काय आवडते? काय नाही याचे ते सूक्ष्म निरिक्षण करून पत्नीला सदैव आनंदी ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. उच्च पदावर नोकरी करीत असल्याने अभ्यास, चिंतन व विचारांच्या तंद्रीत वावरताना दिसतात. परंतु यामध्ये ते आपले सासू-सासरे, सासुरवाडीची माणसं यांच्याविषयी त्यांच्या मनात आदर दिसतो. त्यामुळे साहजिकच अभ्यास व्यासंगीपणामुळे समाजात त्यांनी मान सन्मान मिळविला आहे. मित्रपरिवाराशी, समाजातील प्रत्येक घटकाशी ते आपुलकीने वागताना दिसतात. संस्कार व संस्कृती यांना ते जीवनात अत्यंत महत्व देतात.

लंपनचे बाबा एक कुटुंब प्रमुख या नात्याने यशस्वी वाटतात. तसेच आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेने साहित्याच्या प्रांतात झोकून देताना दिसतात. कविता, ललित निबंध हे त्यांचे विशेष साहित्याचे दालन म्हणावे लागेल.

''भोवरा
फिरे गरगरा
पहा हा जरा
विसावा नाही, विसावा नाही.
त्या कितीही फिरवा
थकवा येई न काही''[१८].........

अशी सहज काव्यरचना ते करताना दिसतात. यावरून त्यांची साहित्यावरील प्रीति व विश्वस्तता

दिसून येते.

बाबा हे पात्र म्हणून दोन्ही कथासंग्रहात थोड्या प्रमाणात आले असले तरी प्रभावी पात्र म्हणून नजरेत भरते. लोकांच्या व कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा, नात्यागोत्यातील सर्वांच्या मनाचा विचार करीत असल्यामुळे त्यांच्या मनाच्या विचाराची व्यापकता दिसते. साहजिकच समाजाचा त्यांच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन वेगळा असून सर्वांना भितीयुक्त आदर असल्याचे ठिकठिकाणी दिसते.

**लंपनचे आजी व आजोबा :-**

समाजामध्ये घरामध्ये रहात असताना कर्त्या व्यक्तीचे कुटुंबावर नियंत्रण नसल्यास कुटुंब हे कुटुंब रहात नसते. त्यासाठी संपूर्ण नियंत्रण जाणकार माणसांच्या हाती असणे गरजेचे असते व हा जाणकारपणा लंपनचे आजी व आजोबा यांच्यामध्ये असल्याचे वनवास व पंखा कथासंग्रहातून दिसून येते. वरून काटेरी परंतु मनाने अत्यंत प्रेमळ स्वभाव साहजिकच घरातील लोकांशी जे आचरण तेच समाजात असल्याने कोठेही त्यांच्यामध्ये पोकळपणा दिसून येत नाही. आज्जी आजोबांचे केवळ लंपन, बाबूराव, घर तसेच समाजाभोवती त्यांचे वलय पहावयास मिळते.

पती व पत्नी म्हणून आजी व आजोबांचे विचार परस्पर पूरक असून दोघांमध्ये समंजसणपणा दिसून येतो. आपला नातू लंपन याला योग्य संस्कार देवून जीवन घडवण्यास सक्षम बनविण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्न करताल. लंपनवरती अत्यंतिक प्रेम असून त्याच्याशी कोणत्या पध्दतीने आचरण करावे एवढा विशाल सामाजिक दृष्टीकोन त्यांच्यामधून दिसतो. इतर मुलांसारखे खोड्या करणे, खोट बोलणे, अरभाट करू नये या दृष्टीने सातत्याने त्याच्यावर लक्ष ठेवताना दिसतात.

कुटुंबाबरोबर आजोबा समाजकार्यात नेहमीच पुढाकार घेताना दिसतात. शासकीय सेवेत नोकरी केल्याने त्यांच्यातील शिस्त जाणवते तसेच ते चुकीची गोष्ट करणाऱ्यास शासन करताना मागे-पुढे पहात नाहीत. यामुळे समाजात त्यांच्याविषयी भितीयुक्त आदर दिसतो. आर्थिक व्यवहार असो, मित्रपरिवाराच्या सानिध्यात त्यांचे वागणे शिस्तीचे वाटते. परंतु

नातवाबरोबर खेळताना सर्व वयोमान विसरून त्याच्याबरोबर रमताना दिसतात. समयसूचकता आजोबांना आवडत असते. मुलाची गोष्ट कथेत न चुकता आपल्या पत्नीचा वाढदिवस लक्षात ठेवून आहेत.

''आत जाऊन हे फूल हिला दे.''[१९] असे म्हणणारे आजोबा प्रेम, माया, शिस्तपणा, समाजकार्य या सर्वच स्तरावर आदर्श असे व्यक्तीमत्व असल्याचे तसेच ते नेहमीच दुसऱ्यांसाठी जगावं यास धरून असणारे आचरण सामाजिक जाणीव करून देताना दिसते.

लंपनच्या आजीचा स्वभाव मऊ प्रसंगी कठोर वाटतो. समाजात आपल्या पतीस कोठेही कमीपणा न येईल याची ती काळजी घेते. पतीनिष्ठा व प्रीति तिच्यामध्ये जाणवून संस्कारक्षम, आदर्श स्त्रीचे ती द्योतक वाटते. वार्धक्यात देखील आपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे पार पाडते. तसेच लंपनला घडवण्याचा व त्यास यशस्वी बनवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करताना दिसते. घरगडी बाबूराव असो वा समाजातील व्यक्ती, कळकटपणा, उनाडपणा व वाईट गोष्टींचा तिटकारा जाणवतो. वरून काट्यासारखी वाटणारी आजी आतून प्रेमळ दिसते. दुसऱ्यांना समजून घेऊन त्यांच्या चुकांना पोटात घालणे एवढा उदात्त हेतू ठिकठिकाणी दिसतो. समाजातील कार्यक्रम असो वा देवधर्मासाठी जाणे येणे यामध्ये सर्वांना ती योग्य स्थान देते. संसार, घर व उच्चतम संस्कार या गोष्टीमुळे आजीची प्रतिमा समाजापुढे आदर्श अशीच वाटते.

लंपन आजारी असला किंबहुना चांगला असला तरी देखील पोटच्या गोळ्याप्रमाणे अखंड प्रेम देण्याचा प्रयत्न करते. यामधून केवळ यशस्वी आजीची भूमिकाच पार पाडताना ती दिसत नसून ममत्वाचा, मायेचा साक्षात्कार दिसून येतो. मुलांनी योग्य संस्कार घ्यावेत, आई वडिलांचे नांव काढावे, खूप खूप शिकावं, मोठ व्हावं एवढीच तिची भावना असून समाजातील प्रत्येक घटकाला आदर्शाचे द्योतक अशीच ती वाटते.

### सुमीचे आजी-आजोबा :-

सुमीच्या आजोबांना चिंत्या तर आजीला गंगूवहिनी म्हणून संबोधत. घराला घरपण आणणारी स्त्री व घराला लाभणारा शेजार यावर यशस्वी संसार अवलंबून असतो. सुमीचे आजोबा व आजी या दोघांमध्ये संस्काराचा ठेवा तसेच स्वतंत्र वैचारिक बैठक

असल्याचे दिसते. दोघांच्या स्वभावात फरक असला तरी प्रेमाची नाळ त्यांच्यामध्ये प्रभावी वाटते.

आजोबांचा स्वभाव मुळातच खवचट, बडबडा असाच वाटतो. भूगोलाचे ज्ञानात त्यांना विशेष आवड असल्याने दिशांना ते अधिक महत्व देताना दिसतात. सतत पानाचा तोबरा तोंडात भरून आपल्या कामात व्यस्त असल्याचे दिसते. दुसऱ्याला चिडवणारी माणसं समाजात भेटतात याचा प्रत्यंतर सुमीच्या आजोबांच्या मधून दिसत असला तरी प्रेम हा त्यांच्या जीवनाचा गाभा वाटतो. कोणीही आपल्या घरातील लोकांना वाईट नावांनी हाका मारू नयेत असा त्यांचा सामाजिक दृष्टीकोन पहावयास मिळतो. चांगुलपणाबरोबर वाईटास वाईट असा त्यांच्या जीवनशैलीचा भाग आहे. मित्रांच्यासमवेत जुन्या आठवणींना उजाळा देऊन आनंदाच्या डोहात मनसोक्त डुंबणारे आजोबा यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्वच्छन्दी वाटतो. विनोदीपणा त्यांच्यामध्येसतत जाणवत राहतो. सुमीत्रा आहे का घरात या प्रश्नावर "हो, हो-ही कॉय खिषॉत बसली ऑहे बंडीच्या."[२०] असे नर्मविनोद करताना दिसतात. आपली नात सुमन व लंपन यांच्या अतूट जिव्हाळ्याचा त्यांना गर्व असून समाजाचा विचार न करता आपले स्वच्छन्दी वागणेच त्यांना पसंत आहे.काही कठीण प्रसंगात नेहमी धीराने तोंड दयावे हा त्यांचा सल्ला योग्य वाटतो. तर आपली पत्नी, नात सुमन व सर्व परिवारास कुठेही सुखाची कमतरता येवू नये यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील वाटतात.

सुमीची आजी मात्र घरकामात धन्यता मानून सर्वांशी प्रेमाने वागणारी, सेवाभावी वृत्तीची साध्वी स्त्री वाटते. सामाजिक बांधीलकी जोपासतना दिसते. आपला संसार सुखाचा असावा एवढाच विचार तिच्यातून व्यक्त होवून सुमीची काळजी घेताना दिसते. माणसानं घडलेल्या गोष्टीचा विचार न करता सर्व काही दमानं घ्याव ही त्यांची शिकवण समाजाला वेगळं काही देणारी वाटते. चीड, खोटेपणा, राग, व्देष असा कोणताच दोष तिच्यामध्ये दिसत नाही.

**बाबूराव :-**

वनवास व पंखा कथासंग्रहातून लंपनच्या भावविश्वात सदेव सोबतीला असणारा व लंपनच्या सुख-दु:खातील वाटेकरी आहे. घरगडी म्हणून बाबूरावचा संबंध आला

असला तरी त्याला घरातील नोकरांचे स्थान नसून कुटुंबातील एक सदस्य म्हणूनच त्याची भूमिका नजरेत भरते.

बाबूराव हा साधा, सरळ, भोळा व प्रामाणिक असल्याचे व तितकेच सिनेमाचे वेड असणारा प्रकर्षाने दिसतो. शरीराने सुंदर नसला तरी मनातील वात्सल्य व प्रेमामुळे त्याच्यावर आजोबा, आजी तसेच सुमीचे प्रेम असल्याचे दिसते. घरातील सर्व कामे व्यवस्थित करून सर्वांची काळजी घेण्याच्या सवयीमुळे एक काळजीवाहू म्हणून त्याला संबोधणे उचित वाटते.

बाबूराव हा साधा सरळ असल्याने वास्तव व खऱ्या जगाची ओळख नसल्याने तो पद्माक्का नावाच्या फसव्या स्त्रीच्या नादाला लागतो व त्यामध्ये त्याच्या होणाऱ्या लुबाडणूकीमुळे समाजातील सत्याची डोळसपणे जाग त्याला येते. नेहमी इस्त्रीचे कपडे, तोंडात गाणं व हातात काम असा हा बाबूराव असून समाजामध्ये वावरताना, मिसळताना कुठेही कमी वाटत नाही. संपूर्ण घर जरी त्याच्यावर सोपवून गेले तरी घरातील काडी कुठे हलणार नाही. यामुळे सहाजिकच बाबूराव सारख्या लोकांची उणीव समाजात पहावयास मिळते. दोन्ही कथासंग्रहातून कुटुंब, नोकर व समाज याची बांधीलकी जोपासताना तो दिसतो. वनवास, वीज, भेट, फुलाची गोष्ट तसेच पंखा संग्रहातील सफाई, पॅच युग, या कथातून बाबूराव केवळ सामाजिक बांधीलकी जोपासून प्रेम, जिव्हाळा आपल्या परिने सर्वांना देवून प्रामाणिकपणे सेवा करताना दिसतो. अर्थात लंपनच्या सहवासातील प्रत्येक घटनांना व त्याच्या दु:खावर मायेने फुंकर घालणाऱ्या बाबूरावकडे पाहिल्यास नोकरापेक्षा त्याचे नाते जवळचे वाटते. परंतु एकाकी व पत्नीसुखापासून वंचित असल्याने सहाजिकच समाजातील प्रत्येकाचे लग्न व्हावे, सुखी संसार असणे या समाजाच्या चौकटीत बाबूराव दुर्दैवी ठरला आहे. मात्र स्वत: या गोष्टीचा उल्लेख त्याने कोठेच केलेला नसल्याने तो सर्वांच्या लक्षात राहिला आहे.

## 'वनवास' कथासंग्रहातील इतर पात्रांचा सामाजिक दृष्टीने अभ्यास :-

### १) जंब्या कटकोळ :-

जंब्या कटकोळ हा लंपनचा मित्र असला तरी त्याच्यातील आरभाटपणा, भांडखोरपणा

व आडदांडपणामुळे समाज त्याच्याकडे एक टवाळखोर मुलगा म्हणून पहाताना दिसतो. सतत मुलांना त्रास देणे, त्यांना मारणे एवढेच नव्हे तर आपल्या ताकदीच्या बळावर मुलांच्यामध्ये दहशत निर्माण केल्याचे स्पष्ट दिसते. घरातील लोकांना उध्दट बोलणे, सतत हुंदडत रहाणे, पैलवानकी करणे व घरातील लोकांच्या जीवावर ऐश करणे अशीच त्याची भावना. ना भविष्याची तमा ना वर्तमानकाळाची. थट्टा मस्करी करणे एवढाच त्याचा उदयोग वाटतो.

अभ्यासात 'ढ' असल्याने जंब्याचे नादी कोणीही लागत नाही. एक वाया गेलेले पोर अशीच त्याची प्रतिमा दिसते. सामाजिक दृष्टीने समाज अशा मुलांना दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो. मात्र एक माणूस म्हणून जंब्या प्रेमळ व सच्चा मित्र या कसोटीत परिपूर्ण वाटतो.खेळ, सहली, शाळेत, वर्गात लंपनच्या सोबतीत असणाऱ्या जंब्याचा विक्षीप्तपणा जाणवत असला तरी, अशी मुल समाजाला आवडत नसली तरी ती त्यांना विसरूही शकत नाहीत.

जंब्याचा स्वभाव कठोर वाटतो मात्र आपल्या मित्राला दुखावू नये याची सामाजिक जाणीव त्यास आहे त्यामुळेच लंपनला त्रास देणाऱ्या मुलांना बेदम मारताना दिसतो.

## २) केबी :-

केबी लंपनच्या शाळेतील क्रिकेट टीमचा कॅप्टन असून त्याची हुशार मुलगा म्हणून प्रतिमा आहे. परंतु अशी वरवर चांगली वाटणारी मुलं घातक असतात याचाच प्रत्यय केबीमधून जावणवत राहतो.

केबीचे किशोर वयातील पदार्पण ही जाणीव असली तरी समाजात राहून गैर वागण्याचा प्रयत्न केल्यास समाज ते मान्य करीलच असे नसते. तुंगभद्रा नावाच्या मुलीच्या मोहात अडकणे, तुंगभद्राला आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी लंपनला त्याने आपल्या सोबत घेवून बळीचा बकरा केलेला आहे. केबी वयाने मोठा असल्याने आपण नक्की काय करतो याचे त्याला भान असते. परंतु आपल्या मनाला आवर घालू शकत नाही. स्वार्थी भावनेने फक्त लंपनशी केलेली ही मैत्री नसून केवळ दिखावा होता.

केबीला जेव्हा आपली चूक लक्षात येते तेव्हा लंपनची क्षमा मागून दोस्तीचा हात पुढे केल्याने स्वार्थीपणा जावून खऱ्या मित्राची प्रचिती येते. साहजिकच कोणीही

चांगल्या गोष्टीसाठी एकमेकांना मदत करावी वाईट गोष्टीसाठी नव्हे हेच केबीतून सहजपणे लक्षात येते. हातून घडणारी चूक वेळीच संभाळणे ही समाजाच्या व स्वत:च्या हितासाठी योग्यच असते ते सहज लक्षात येते.

### ३) टोपीकर मास्तर :-

सुसंस्कृतपणाचे कोणतेच लक्षण नसणारे मात्र मनाने प्रांजळ, निरागस असे हे टोपीकर मास्तर आहेत. काव्याच्या प्रांतात रमून आपला निखळ आनंद त्यात शोधणारे टोपीकर मास्तर दिसतात. परंतु त्याच्या स्वभावात वात्रटपणा, बडबडेपणा व धसमुसळेपणा भिनल्याने अशा व्यक्तीकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन वेगळा होवून केवळ वेड्याचीच उपाधी त्यांना मिळू शकते. ज्याचे वागणे, बोलणे स्वच्छ आहे अशीच माणस मोठी होवू शकतात हा समाजाचा स्थायी सिध्दान्त आहे. परंतु टोपीकरांना इथे केवळ वरवरचा आनंद घेण्यात व विनोदाची अवीट गोडी चाखण्यात धन्यता वाटते. एक मुक्त व निखळ माणूस त्यांच्या रूपाने असून समाजाचे त्याला देणे-घेणे नाही असाच त्याचा दृष्टीकोन दिसून येतो.

### ४) मनी/बिट्या :-

मनी व बिट्या लंपनची भावंडे असून वास्तव जगाशी कसलाच संपर्क नाही. निरागस व अजाण असेच दोघेही आहेत. साहजिकच अशी मुलो साऱ्यांनाच आवडतात.

## 'वनवास' कथासंग्रहातील इतर गौण पात्रांचा सामाजिक दृष्टीने अभ्यास :-

वनवास कथासंग्रहातून ........बारदेसकर, कणबर्गी गंग्या, परशा तांबुटकर, शिवलीला, ललिता, काशिनाथ दळवी, बसवण्णा, वरमुंटीकर देसाई, एशी, एमशी, डीशी, बीशी अशी सर्वच लहान-मोठी पात्रे या कथासंग्रहात आढळतात. यामध्ये समाजाचे त्यांना काहीच भान नसून आपल्याच विश्वात गुंतल्याने ते मनमोकळे व स्वच्छंदी वाटतात.

## 'पंखा' कथासंग्रहातील प्रमुख पात्रांचा सामाजिक दृष्टीने अभ्यास :-

### दुंडाप्पा :-

स्वत: जगता जगता दुसऱ्यांसाठी जगणारी माणसं समाजात फार थोडी आढळत

असतात. पोटापेक्षा भरमसाठ साठविण्याची सवय अनेकांमध्ये पहावयास मिळते. वनवास व पंखा या दोन्ही कथासंग्रहातून अधून-मधून दुंडाप्पाचे पात्र मानवी समाजाला प्रबोधनकार ठरावे असेच वाटतं.

घरात दारिद्रय, फाटका प्रपंच व व्यवसायाने टांगेवाला असलेला दुंडाप्पा मनाने व दिलाने गर्भश्रीमंत आहे. लुबाडणूक, छळवाद या दोषांचा त्याच्यात अजिबात लवलेश नाही. उलट समाजातील प्रत्येक घटकांना मदत करण्याकडे त्याचा कल असलेला दिसून येतो. प्रामाणिकपणा, स्वाभिमानी व वेळेची बांधिलकी जपणारा दुंडाप्पा गरीबीतही आनंदी दिसतो. लोकांच्या मनाचा, त्यांच्या अडीअडचणींना समजून घेवून त्यांच्याशी आचरण केल्याने त्याने स्वत:चे अस्तित्व दाखवून दिले आहे. दुसऱ्यांच्या आनंदात आपला आनंद मानणाऱ्या दुंडाप्पाच्या मनातील व्यापकता लक्षात येते. पैशापेक्षा माणुसकीला जागल्याने सर्वांच्या जिव्हाळ्याचा तो सोबतीदार ठरला आहे. साहजिकच बाया-बापड्यांना विश्वासाचे स्थान म्हणजे दुंडाप्पाचा टांगा असल्याचे दिसते.

मनुष्य कपड्यावरून श्रेष्ठ ठरत नसून त्याच्या गुणांवर तो मोठा ठरत असतो हे सत्य त्याच्याकडे पाहिल्यावर लक्षात येते. लहान असो वा मोठी व्यक्ती विनम्रता, संयमशीलता त्याच्यात दिसून येते. कोणी रागाने त्यास झिडकारले तरी तो आपल्या मार्गावरून जराही बाजूला सरकताना दिसत नाही. विश्वासाची, मायेजी नाती अखंडपणे टिकविण्यातच तो प्रयत्नशील वाटतो.

'डग' कथेत आजीच्या बोलण्यावर लक्ष देत नाही. ''म्हाताऱ्या माणसाचं डोकं जुन्या टांग्यांच्या चाकासारखं असणार सोडा. जरा 'डग्' मारणारचं.''[१२] यावरून तो समाजातील वाईट प्रवृत्तींना देखील हसतमुखाने स्विकारताना दिसतो.

लंपनचा दुंडाप्पाशी या ना त्या कारणाने संबंध आला असल्याने दुंडाप्पाच्या जीवन शैलीची ओळख झालेली दिसते. मात्र सर्वच मुल देवाघरची फुलं असतात याच विचाराने तो प्रेमाने वागताना दिसतो. यावरून त्याच्या मनाचा मोठेपणा तसेच विनम्रता दिसते. साहजिकच दुंडाप्पाचा समाजाकडे पाहण्याचा व विचार करण्याचा दृष्टीकोन विशाल वाटतो. ज्यामध्ये स्वार्थ

नसून परोपकारताच स्पष्ट होते.

## टी.जी. कासारगोड :-

एक माणूस म्हणून टी.जी. कासारगोड योग्य वाटतो याचे प्रमुख कारण म्हणजे समाजाकडे तो फारच मिश्किलपणे व वरवर पहाताना दिसतो. समाज काय म्हणेल यापेक्षा आपल्या कामावर व विचारावर त्याची श्रध्दा आहे. कोठेही चिडचिडपणा न करता सर्वांशी विशेषत: मुलांशी प्रेमाने वागणे त्यांना सायकल चालवावयास शिकविणे, त्यांच्याशी मैत्री करताना दिसतो.

सायकल दुकान चालक या नात्याने तो सर्वांना आवडत असला तरी त्याला लग्नाचे वेध आहेत. लग्न ही संकल्पना समाजाची बांधिलकी म्हणून स्विकारणे हे त्याला पटते. परंतु समाजातील विषण्णता त्याला पटते. साहजिकच तो इतरांपासून दूर व स्वत:च्या विचाराने वागताना दिसतो.

## आण्णा हिंडलगेकर :-

आण्णा हिंडलगेकर हे व्यवसायाने मोटार मेकॅनिक असल्याने सर्व परिचित व्यक्ती दिसते. गाड्यांच्या माध्यमातून झालेल्या ओळखी व त्यातून अतूट जिव्हाळा निर्माण केल्याचे दिसते. आपले कुटुंब, बायको, मुली व प्रपंच या चाकोरीतून चालताना ते दिसतात

निरागस व निष्पाप असणारी मुल त्यांना आवडत असून कला क्षेत्रात आवड असणारी मुल त्यांना विशेष आवडतात. ज्याप्रमाणे गाड्यांची दुरूस्ती करून तिला धावण्यास सक्षम ते बनवित त्याप्रमाणेच एखादा मुलगा मोठा व्हावा, संगीत क्षेत्रात त्याने नाव कमवावे असाच त्यांचा दृष्टीकोन आहे. त्यांना असणारी संगीताची ओढ ते लंपनमध्ये शोधताना दिसतात. म्हणून भेट म्हणून दिलेले नाणं ते लंपनला देवू करतात.

आण्णा हिंडलगेकर सारखी माणस समाजात कमी असतात हाच दृष्टीकोन आपल्या नजरेत भरतो.

## सांबप्रसाद जांबोटकर :-

एक समंजस, विचारी व सुशील म्हणून सांबप्रसाद जांबोटकर यांची प्रतिमा वाटते. ज्या वयात हसायचे, मनसोक्त खेळायचे व जीवनाचा आनंद मनसोक्त घ्यायचा त्या विशिष्ठ वयात हा मुलगा घरचा, कुटुंबाचा विचार करताना दिसतो. गरीब परिस्थितीत आपल्या परिवाराचा विचारकरणारी फार थोडी मुलं समाजात पहावयास मिळतात. समाजातील बोकाळलेला स्वार्थ व माणुसकी, प्रेम विसरलेली माणस पैशासमोर लाचार होतात ही सामाजिक जाणीव त्याला सतत जाणवत राहताना दिसते.

## टोपीकर मास्तर :-

जेथे त्यांचा हात तेथे त्यांची टोपी त्यामुळे त्यांना टोपीकर मास्तर अशी उपाधी मिळाली असल्याचे दिसते. वयाने मोठे असून देखील लहान मुलाप्रमाणे त्यांचे वागणे आहे. कुठेच संस्कृतीचे सुलक्षण त्यांच्यामध्ये पहावयास मिळणार नाही. सर्व गोष्टी वरवर मनावरती घेणारे अशीच टोपीकरांची प्रतिमा वाटते.

कविता करणेचा छंद व त्याच छंदात गुंतून राहण्याची त्यांना सवय आहे. साहजिकच ते काव्यवेडे वाटतात. कविता मोठ्यानी सांगणे, घरात न सांगता स्वयंपाक घरापर्यंत जाणे असा विक्षिप्तपणा त्यांच्यामध्ये दिसतो. कोणत्याही विषयावर शीघ्र कविता करण्याचा त्यांचा पिंड असून मनाने स्वच्छ व प्रांजळ वाटतात. पोरकटपणा त्यांच्या ठिकाणी असला तरी विश्वासाला कोठे तडा जाईल असे त्यांचे कोठलेच आचरण नाही. केवळ आपल म्हणून वावरण्याचा त्यांचा हेका दिसतो. कवी हे शाबासकीचे, टाळ्यांचे भुकेलेले असतात त्याचेच भोक्ते असे हे टोपीकर वाटतात.

निखळ मनाचा सच्चा मित्र, कवितेच्या प्रांगणात आपला आनदं शोधणारे, विश्वासू, व मनाचा मोठेपणा असे अनेक पदर त्यांच्या आचरणातून, विचारातून स्पष्ट जाणवतात. मनाने स्वच्छ व हृदयात मांगल्य त्यांच्यासारखे सतत जाणवत राहते.

### मनी व बिट्ट्या :-

'वनवास' व 'पंखा' या दोन्ही कथासंग्रहात लंपनची भावंड यापुरती मनी व बिट्या ही पात्र वावरत असली तरी त्यांच्यामधून निरागस बंधूप्रेम सतत जाणवत राहते. ना उद्याची काळजी वा आजची. आई-बाबांच्या मायेखाली, छत्राखाली सुखाने राहणारी अशीच दोघेही वाटतात. निरागस, मनात कसलाच स्वार्थ नाही उलट आपल्या लंपुदादाला भेटण्याची आसक्ती व कुटुंबात मनमोकळेपणाने वावरणे एवढीच त्यांचा माफक इच्छा प्रकट होताना दिसते. आपला भाऊ परगावी आहे याचे दुःख त्यांनाही झाले नाही असे नाही. आपला मोठा भाऊ ही त्यांच्या मनात खोलवर रूतून बसल्याची जाणीव स्पष्ट होते.

### 'वनवास' कथासंग्रहातील इतर गौण पात्रे :-

वनवास कथासंग्रहात लंपनच्या भावविश्वातील अनेक मित्र साक्षीदार आहेत. पैकी फासल्या बारदेसकर, कणबर्गी गंग्या, परश्या तांबुटकर, वश्या, शिवलीला, ललिता, काशिनाथ दळवी, चिंटया, एशी, डिशी, एमशी, घंटीमठ हे सर्वजण लंपनभोवतीची स्मरण कडी आहे.

ही सर्वच पात्रे निरागस असून मनात कसलाच स्वार्थ नसणारी अजाण असल्याचे दिसते. खेळ, शाळा, सहल, दंगा एवढ्यापुरते त्यांचे विश्व वाटते. खऱ्या वास्तव जगाची कसलीच तमा व कल्पना नाही केवळ हसत खेळत राहणे, शाळेत जाणे, खोड्या करणे एवढेच त्यांच्या जीवनाचे फलीत व उद्देश असल्याचे दिसते.

### 'पंखा' कथासंग्रहातील प्रमुख पात्रांचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास :-

### दुंडाप्पा :-

दुंडाप्पा व्यवसायाने टांगेवाला असून गरीब कुटुंबात संसाराचा गाडा ओढणारा एक कर्ता पुरूष म्हणून नजरेस येतो. घरची आर्थिक परिस्थिती बिकट असूनसुध्दा तो कोणत्याच मोहास बळी पडल्याचे दिसत नाही. उलट पैशापेक्षा माणुसकीस त्याने अधिक प्राधान्य दिल्याचे दिसते. वेळेचा पक्का व अंगात असणाऱ्या प्रामाणिकपणामुळे लोकांचा लाडका व विश्वासू टांगेवाला अशीच त्याची प्रतिमा वाटते. सर्वांशी प्रेमाने वागून गरजेइतपतच दुसऱ्यांकडून पैसे घ्यावेत

अशीच त्याची मानसिकता वाटते. थोरा मोठ्यांचा, बाया बापड्यांचा तसेच लहान मुलांच्या मनाचा विचार करून त्यांच्याशी आचरण करणारा दुंडाप्पा मनाने स्वच्छ व निखळ वाटतो. चोरी, लबाडी पेक्षा श्रमावरती त्याचा अधिक विश्वास असल्याचे स्पष्ट दिसते. दुसऱ्यांच्या आनंदात आपला आनंद मानून निर्व्याज आनंद घेण्यात त्याला बरे वाटते. लोकांच्या अडीअडचणी लक्षात घेऊन त्यांच्या उपयोगी पडणं यालाच तो पुण्य समजतो.

दुंडाप्पाची मैत्री साऱ्यांशी असल्याने त्यांच्या व्यवसायात तो आनंदी वाटतो. लहान मुले, प्राणी (विशेषत: त्याचा लाल्या घोडा) यांच्यावर त्याची अखंड माया असल्याचे दिसते. स्वत:च्या स्वार्थापोटी दुसऱ्यांना त्रास देण्याची त्याची वृत्ती नाही. उलट त्याच्या मनातील उदारपणा दिसून येतो. कोणी शिव्या दिल्या तरी उध्दट न बोलता केवळ स्मितहास्य करून वाईट प्रवृत्तीला स्वीकारण्याची त्याची मानसिक तयारी ठिकठिकाणी दितसे. मनाने विनम्र, बोलण्यात माधुर्य जाणवते. डग कथेत म्हाताऱ्या आजीला केलेले सहकार्य त्याच्या परोपकारता या गुणाचा आविष्कार करून देतो. आजीच्या कडवट बोलण्यावर लक्ष न देता योग्य ठिकाणी पोहचविणारा दुंडाप्पा मनाने व्यापक वाटतो तर दुसरीकडे माणुसकीचा वसा कायम ठेवावा हीच त्याची धारणा वाटते. ''पैशांचं ऱ्हाऊं दे जाऊं दे, तो म्हणाला.''त्याऐवजी आशीर्वाद द्या जावा.''[२२] यावरून तो केवळ माणुसकीचा भुकेलेला असल्याचे दिसते.

दुंडाप्पा दिसायला अस्वच्छ असला तरी मनाने स्वच्छ व श्रीमंत वाटतो. माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे अशीच त्याच्या मनातील प्रबळ भावना प्रकट होताना दिसते तर दुसरीकडे कुटुंबाची यशस्वी जबाबदारी पार पाडताना कोणी दुखावेल का? याची काळजी घेतना दिसतो. एकूण जीवनातील कठीण प्रसंगाना सामोरे जावून, यशस्वीपणे जीवन जगावे व दु:खातही सुख मानून सर्वांशी प्रेमाने वागावे असे अनेक समाजकल्याणपर पदर त्याचेमधून पहावयास मिळतात.

## टी.जी. कासारगोड :-

सायकल मार्टचा मालक या नात्याने टी.जी. कासारगोड 'पंखा' कथासंग्रहात आला असला तरी मनाने अल्लड असेच त्याचे व्यक्तिमत्व आहे. मुलांना मायेने लळा

लावून त्यांच्या आनंदात सुख मानण्याची त्याची मानसिकता आहे. आपले लग्न होत नाही याची इतरांप्रमाणे त्याला खंत असून लग्नाविषयीचे स्वप्न पहाणे याला तो अपवाद नाही. समाजात जगायचे असेल तर वास्तव सत्य पचांवण्याशिवाय पर्याय नसून 'संघर्ष' हाच यशस्वी जीवनाचा मार्ग आहे. अशाच स्पष्ट भावनेचा उद्रेक कासारगोडमधून पहावयास मिळतो.

## अण्णा हिंडलगेकर :-

मनाने प्रेमळ व मानवतेबद्दलचा अढळ विश्वास अण्णा हिंडलगेकर यांच्या मनाचा केंद्रबिंदू दिसून येतो. स्वत:ची मुलं व दुसऱ्याची मुलं यात कसलाच फरक न करता सर्वांशी प्रेमाने वागण्यामुळे त्याच्यातील या विशेष गुणामुळे अण्णाबद्दल परिसरात आदर असल्याचे दिसते.

मुळातच बिघडलेल्या मोटारींचे 'मेकॅनिक' म्हणून काम करणाऱ्या अण्णांना 'माणूस' जातीमधील बिघडलेल्या डोक्याचा पूर्ण अनुभव असल्याचे दिसते. लहान मुलास अथवा एखाद्या व्यक्तीस चांगल्या कामाबद्दल शाबासकी व बक्षीस देवून त्याचा गौरव केल्याने त्यास स्फूर्ती मिळून नाव मिळवील अशी खात्री त्यांना असते. प्रेरणा द्योतक असाच त्याच्या मनाचा ठेका दिसून येतो. कुटुंबाची वत्सलता, संस्कृतीचे पालन करणे तसेच हसत हसत जीवन व्यतीत करणे हाच अण्णांच्या वागण्याचा विचाराचा मुख्य हेतू स्पष्ट होतो. आपल्याबरोबर इतरांनीही खूप मोठं नाव कमवावं हा त्यांचा दृष्टीकोन विशालतेचे प्रतीक वाटते.

## सांबप्रसाद जांबोटकर :-

लहान वयात आपल्या घरच्या परिस्थितीचा विचार करून वागणारा समंजस व विचारी मुलगा म्हणून 'पंखा' कथेतून सांबप्रसाद जांबोटकर ठळकपणे नजरेत भरतो. परिस्थिती माणसाला घडवत असते याचे ज्वलंत उदाहरण जांबोटकर असून लहान मुले देखील मोठ्याप्रमाणे विचारशील असताना यामधून दिसते. निरागस मनात दु:खाची सतत छाया त्यांच्यामध्ये असल्याचे दिसून त्यांच्या मनावर कुटुंबातील अस्वास्थ्याचा परिणाम जाणवतो. लहानपणीच कुटुंबाचा विचार जांबोटकरांच्या विचारांच्या प्रगल्भतेची ओळख देते. सूज्ञ,

शहाणा, विचाराने प्रौढ वाटतो. पैसा हे सर्व दु:खाचे मूळ असते हे त्यांच्या मनात खोलवर रूतून बसले असून आपला मित्र लंपनजवळ मनातील दु:ख व्यक्त करतो. साहजिकच दोघांची वैचारिक परिपक्वता मैत्रीचे मूळ असून स्वार्थ नसावा ही स्पष्ट जाणीव त्यांच्या कोवळ्या मनास स्पर्श करताना दिसते. कुटुंबाची होणारी वाताहत व भांडणे याचे मूळ गरीबीत असते हे मानसशास्त्र त्याने ओळखले असल्याचे जाणवते. साहजिकच अतिविचाराने मुले कोडगी बनत असतात परंतु आपल्या परिने पर्याय काढण्याचा प्रयत्न करताना तो दिसतो. ज्यांनी आपल्या कुटुंबाला लुबाडले आहे त्यांच्या विषयी त्याच्या कोवळ्या मनात घृणा निर्माण होताना दिसते. कमी वयात जांबोटकराच्या मनातील आलेले विचार, विविध पदर वाचकांना सुन्न करतात.

**सावकार :-**

दुसऱ्याचे जे काही आहे ते आपले म्हणून सांगणे, त्यांना लुबाडणे व स्वत: ऐशआरामाचे जीवन जगणे अशा मनोप्रवृत्तीचा कपटी माणूस म्हणून सावकार हे प्रतिक वाटते.

कष्ट न करता जीवन जगणे हे त्यांच्या मानसिकतेचे मूळ दिसते. इतरांच्यावर अन्याय करणे व खोट्या प्रतिष्ठेपायी सर्वस्व जोखून देणारे असूरी मन त्याच्याजवळ पहावयास मिळते. जुगार, मारामारी, अल्लड खेळ करणे, मित्रांच्या संगतीत राहून अर्वाच्य वागणे, बोलणे यामधून केवळ सावकारामधील गुंडप्रवृत्तीचा अविष्कार दिसतो.

बायका-पोर, आई-वडील, भावंड यांचा कसलाच विचार तो करीत नसल्याने रिकामटेकडा व बेजबाबदारपणा त्याच्यामधून दिसतो. परंतु कोणतीच गोष्ट चिरंतकाल टिकत नसून त्याचा शेवट निश्चीत असतो. दुष्ट मित्रांच्या नादी लागणाऱ्या सावकाराची मानसिकता दुष्ट असली तरी पोटातील आग त्याला शांत बसू देत नाही हेच खरे आहे. शेवटी सावकाराला आपला पोकळ बाज बाजूला ठेवून जुन्या बाजारात पंखा विकण्याची वेळ आल्याचे दिसते. ''काय बाळ, मला ओळखलं नाहीस नां? मी सावकार... मी आता तिथं राहतो.''[२३] या त्याच्या बोलण्यामधून त्याच्यात झालेले परिवर्तन सहज लक्षात येते. शेवटी कष्टाविना फळ नाही हेच सावकाराच्या व्यक्तिचित्रातून स्पष्ट होताना दिसते.

**मन्याशेट :-**

मन्याशेट हा अत्यंत हुशार असतो. मात्र घरच्या कलहामुळे केवळ भटकंती करणे एवढेच त्याच्या वाट्याला आलेले दिसते. आपल्यास भावविश्वात हरवलेल्या मन्याशेटला कशाचेच भान नाही. समाजाने त्याला वेडा ठरवलेले असते. परंतु लंपनशी झालेल्या जिव्हाळ्यामुळे तो शहाणाच असावा असे वाटते. कधी शहाणपणा तर कधी लहरीपणा मन्याशेटमध्ये पहावयास मिळाला आहे. पुस्तकांच्या संगतीत रमणारा 'मन्या' निसर्गाच्या सानिध्यात रमताना दिसतो. निसर्गाचे व वाचनाचे वेड मन्याशेटमध्ये आढळते. झाडाच्या फांद्या, विविध खडक, दगडांचे नमुने गोळा करण्याचा छंद हे त्याच्या रसिक व विज्ञान मनाची साक्ष पटवते. आपले साहित्य दुसऱ्यास अभ्यासाला दयावे इथपर्यंत त्यांचा शहाणपणा वेडेपणावर मात करताना दिसतो.

मन्याशेटचा स्वभाव प्रेमळ असून लहान मलांना तो आवडतो. शांत, गंभीरपणा व लहरीपणा यामुळे मन्याशेटच्या मनातील दु:ख कोणासही दिसत नसल्याचे जाणवते. केवळ आपल्याच लहरीपणात फिरत राहणे एवढेच त्यांच्या मनात भरून राहिल्याचे दिसते. यामध्ये मन्याशेटचा वास्तवतेशी संबंध तुटला जावून वेड्याच्या बंधनात तो हरवलेला दिसतो आहे तो कायमचाच.......

**निमामावशी व सरला :-**

आपल्या कुटुंबातील अस्वास्थयाच्या परिणामामुळे या दोघी माय लेकींची अवस्था विचित्र झाली असल्याचे दिसते. दुसऱ्यांचे सुख पाहून आपल्यालाही असेच सुख लाभावे व आपल्या कुटुंबातील सौख्य टिकून रहावे एवढाच विचार दोघीमधून स्पष्ट दिसतो. याचबरोबर कोणासही वाईट बोलून दुखावण्यापेक्षा सर्वांनी आनंदाने रहावे अशीच त्यांच्या मनाची धारणा आहे. सुखाच्या प्रतिक्षेत व विरंगुळ्याच्या शोधात त्या नेहमीच असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

**रतन व रतनची आई :-**

घरच्या गुलामगिरीस व अन्यायास कंटाळलेल्या या मायलेकी मनातल्या मनात कुढत

असल्याचे दिसते. भितीने व गरीबीमुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागल्याचे विदारक चित्र ठळकपणे नजरेत भरते.

सर्वासारख आपणही मुक्त असावे तसेच आपणही नटावे, मुरडावे, चांगला प्रपंच करावा, कष्टाने कमवून खावे अशी त्यांची माफक इच्छा असली तरी नवऱ्याच्या धाकाला रतनची आई तर रतन आईच्या प्रेमास मुकली आहे. त्या दोघींच्या मनावर गरिबी, अत्याचाराचा परिणाम होवून त्या गुलामगिरीच्या जोखडात बंदिस्त झाल्याच्या दिसतात. त्यांचे मनोबल ठिकठिकाणी खचल्याचे जाणवते.

**'पंखा' कथासंग्रहातील इतर गौण पात्रे :-**

'पंखा' कथासंग्रहातून नडग्यायारख्या दुष्ट व ऐतखाऊ मनोवृत्तीचा साक्षात्कार दिसतो. सुखात सर्वजण सहभागी व दु:खात कोणीही नसते हेच चिरंतन सत्य यामधून दिसते.

'झांज' कथेत आपल्या लग्नाची व भविष्याची स्वप्ने पहाणारी खंडेराव व कमळी यांची निरागस मने दिसतात तर दुसरीकडे सुरक्या, चंदा, दमयंती, विभाकर आदी लंपनच्या निरागस मित्र परिवाराचा अविष्कार, त्यांची व्यथा व सुख पंखा कथासंग्रहात चित्रीत झाले आहे.

लहान मुले म्हणजे देवाघरची फुले असतात. त्याच्यामध्ये कोणताच स्वार्थ वा लबाडी नसते. केवळ निर्मळ मैत्री व अखंड विश्वास हाच लंपनभोवतालच्या मित्रपरिवाराचा प्रामुख्याने विचार स्पष्ट होताना दिसतो.

## संदर्भ टीपा :-

१) वनवास

प्रकाश संत,

मौज प्रकाशन, ४११, चौथी आवृत्ती,डिसेंबर २००१,

पृ. क्र.११.

२) पंखा

प्रकाश संत,

मौज प्रकाशन, मुंबई ४९८, दुसरी आवृत्ती, २५ डिसेंबर २००१,

पृ. क्र. १६३.

३) तत्रैव, पृ. क्र. १९०.

४) वनवास

प्रकाश संत,

मौज प्रकाशन, ४११, मुंबई, चौथी आवृत्ती,डिसेंबर २००१,

पृ. क्र.२०.

५) तत्रैव, पृ. क्र. १४७.

६) तत्रैव, पृ. क्र. ११.

७) तत्रैव, पृ. क्र. १३८.

८) तत्रैव, पृ. क्र. ६४.

९) पंखा

प्रकाश संत,

मौज प्रकाशन, मुंबई ४९८, दुसरी आवृत्ती, २५ डिसेंबर २००१,

पृ. क्र. २१.

१०) वनवास

प्रकाश संत,

मौज प्रकाशन, ४११, मुंबई, चौथी आवृत्ती,डिसेंबर २००१,

पृ. क्र.३९.

११) पंखा

प्रकाश संत,

मौज प्रकाशन, मुंबई ४९८, दुसरी आवृत्ती, २५ डिसेंबर २००१, ,

पृ. क्र. २१.

१२) वनवास

प्रकाश संत,

मौज प्रकाशन, ४११, मुंबई, चौथी आवृत्ती,डिसेंबर २००१,

पृ. क्र.१८२.

१३) तत्रैव, पृ.क्र. १२.

१४) तत्रैव, पृ. क्र. ५१.

१५) तत्रैव, पृ.क्र. २३.

१६) पंखा

प्रकाश संत,

मौज प्रकाशन, मुंबई ४९८, दुसरी आवृत्ती, २५ डिसेंबर २००१,

पृ. क्र. ६.

१७) वनवास

प्रकाश संत,

मौज प्रकाशन, ४११, मुंबई, चौथी आवृत्ती, डिसेंबर २००१,

पृ. क्र.१२.

१८) तत्रैव, पृ. क्र. १३०/३१

१९) तत्रैव, पृ. क्र. १९.

२०) तत्रैव, पृ. क्र. २६.

२१) पंखा

प्रकाश संत,

मौज प्रकाशन, मुंबई ४९८, दुसरी आवृत्ती, २५ डिसेंबर २००१,

पृ. क्र. ४०.

२२) तत्रैव, पृ. क्र. ४०.

२३) तत्रैव, पृ. क्र. १६८.

***